शुक्रवार, ९ जून २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२६८
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 9 JUNE 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-268 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

## भाजपला मोदी आणि हिंदुत्व पुरेसे नाही

### लोकसभा २०२४ : संघाने दिला आत्मचिंतनाचा सल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : नवी दिल्ली : लोकसभेची निवडणूक पुढच्यावर्षी पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक पक्ष आतापासूनच जोरदार तयारीला लागला आहे. भाजपच्या गोटात अनेक महत्वपूर्ण हालचाली घडत आहेत. तिकडे देशभरातील सर्व विरोधी पक्ष एकत्र येण्यासाठी बैठका घेत आहेत. दुसरीकडे भाजपला नुकतेच कर्नाटक विधानसभा निवडणुकीत अपयश आले आहे. त्यामुळे भाजपला आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जोमाने तयारी करावी लागणार आहे. दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भाजपला आत्मचिंतनाचा मोलाचा सल्ला दिला आहे.**



'ऑर्गनायझर' या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुखपत्रात छापून आलेल्या लेखात म्हटले आहे की, भाजपला आगामी निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवण्यासाठी केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हिंदुत्व पुरेसे नाही. 2024च्या निवडणुका तसेच इतर निवडणुका जिंकण्यासाठी प्रचंड जनसामान्यांचा पाठिंबा आणि प्रादेशिक नेतृत्वाशिवाय निवडणुका जिंकणे सोपे नाही.

भाजपने कर्नाटक विधानसभा निवडणुकीत केवळ स्टार प्रचारक असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यावर जोर दिला होता. कर्नाटक विधानसभा निवडणुकीदरम्यान भाजपकडून अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले ज्यांचा संबंध हिदुत्वाशी होता. आपण या मुद्द्यांवर जोर दिला तर निवडणूक जिंकू शकतो, असे भाजपला वाटत होते. पण सर्वसामान्य नागरिकांनी भाजपला पाठिंबा न देता काँग्रेसला पसंती दिली. त्यामुळे काँग्रेसचा सर्वाधिक जागांवर विजय झाला आणि भाजपला सर्वात मोठा झटका बसला.

### चर्चेतली बातमी

## मराठवाडा मुक्ती संग्राम स्मृती स्मारक उभारणार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महानगराच्या मध्यवर्ती ठिकाणी भव्य असे स्मृती स्मारक उभारण्यात येणार असून हे स्मारक विद्यार्थी, नागरिक व पर्यटक यांच्यासाठी प्रेरणा देणारे ठरेल, अशी माहिती पालकमंत्री संदीपान भूमरे यांनी दिली. विभागीय आयुक्त कार्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मंत्रीमंडळ उप समितीची बैठकीत पालकमंत्री श्री. भूमरे बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर, जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त जगदिश मिनीयार यांच्यासह व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे आठही जिल्हयाचे जिल्हाधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री भूमरे म्हणाले, मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मराठवाडयातील आठही जिल्हयात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महानगरातील मध्यवर्ती ठिकाणी स्मारक उभारण्यात येणार आहे. दोन वर्षात स्मारकाचे काम पूर्ण होईल.



## इंद्रायणी नदीत पुन्हा रसायनयुक्त पाणी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** इंद्रायणी नदीत आज पुन्हा फेसाळ पाणी वाहताना दिसत आहे. जे पाणी वारकऱ्यांच्या आरोग्याला धोका ठरत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा कानाडोळा याला कारणीभूत ठरत आहे. पिंपरी चिंचवड हद्दीतील अनेक कंपन्या इंद्रायणी नदीत रसायनयुक्त पाणी सोडतात, परिणामी नदीची दयनीय अवस्था होते. एबीपी माझाने जानेवारी महिन्यात हा प्रकार समोर आणला होता त्यावेळी सहा कंपन्यांवर गुन्हे दाखल झाले होते. मात्र परिस्थिती जैसे थे असल्याने कारवाईचा हा फार्स होता हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

इंद्रायणी नदीवर रसायनयुक्त पाण्याचा फेस तयार झाला आहे. रसायनयुक्त पाण्यामुळे नदी प्रचंड प्रमाणात प्रदूषित झाली आहे. नदीची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे या सगळ्या अनाधिकृत कंपन्यांवर कारवाई करा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात होती. त्यावेळी नागरिकांच्या मागणीला यश आलं होतं आणि या कंपन्यांवर कारवाई देखील केली होती. मात्र अजूनही या नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न मिटलेला नाही. लोणावळा शहरातून या इंद्रायणी नदीचा उगम होतो. त्या दरम्यान पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक क्षेत्र आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत कंपन्या आहेत. या कंपन्यांमधून प्रक्रिया न केलेले रसायनयुक्त पाणी नदीत सोडले जाते. त्यामुळे नदीत प्रदूषण पसरत आहे. या प्रदूषणामुळे नदीकाठावर राहणाऱ्या अनेक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

## मान्सून केरळात दाखल

### चक्रीवादळानंतर मान्सून देशात सक्रिय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उन्हाच्या चटक्यानंतर शेतकऱ्यांची नजर आता आकाशाकडे लागली आहे. पावसाचा अंदाज घेत शेतात पुन्हा पेरणी, लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांची तगमग सुरू झालेली दिसत आहे. मात्र, दरवर्षी सामान्यपणे १ जून रोजी केरळमध्ये दाखल होणारा मान्सून लांबल्याने शेतकरी चिंतेत होता. अखेर गुरुवारी (८ जून) मान्सून केरळात दाखल झाला. यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचं वातावरण दिसत आहे. दरम्यान, यावर्षी मान्सूनला केरळात दाखल व्हायला ७ दिवस उशीर झाला आहे.केरळनंतर आता मान्सून तामिळनाडू, कर्नाटक आणि इतर भागात जाईल. पुढील ४८ तासात केरळच्या सर्व भागांमध्ये मान्सूनची हजेरी लागणार आहे. चक्रीवादळ गेले की, मान्सून पूर्ण तीव्रतेने देशाच्या इतर भागात वाटचाल करेल, असाही अंदाज वर्तवला जात आहे. यंदा बिपरजॉय चक्रीवादळामुळे मान्सूनवर परिणाम झाला आहे. सुरुवातीच्या काळात मान्सून कमी तीव्रतेचा असेल, असा इशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे. मान्सूनच्या आगमनानंतर पहिल्या आठवड्यातील प्रवासावरून त्याच्या देशातील पुढील वाटचालीचा अंदाज बांधता येणार आहे. दरम्यान, आधी भारतीय हवामान खात्याने ९ जूनला मान्सून महाराष्ट्रात दाखल



होईल असा अंदाज वर्तवला होता. मात्र, केरळमध्ये दाखल व्हायलाच ८ जूनचा दिवस उजाडल्याने आता महाराष्ट्रातील मान्सूनचा प्रवेश पुढे ढकलला आहे. असे असले तरी पुढील ३-४ दिवसात मान्सून राज्यात दाखल होऊ शकतो. गेल्या काही दिवसांपासून अरबी समुद्रात चक्रीवादळाच्या अनेक चर्चा होत्या. तरीही वाऱ्यांची स्थिती आणि वेग पाहता किनारपट्टी भागांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. याच भागामध्ये येत्या २४ तासात कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन त्याची तीव्रता पुढील ४८ तासांमध्ये वाढू शकते. त्यामुळे किनारपट्टीवर आर्द्रता वाढून कोकण विभागात आठवड्याच्या अखेरीस पाऊस पडू शकेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामानाचे दोन वेगवेगळे मॉडेल वेगवेगळी स्थिती दर्शवत असल्याने मान्सूनच्या आगमनाबाबतचा अचूक अंदाज वर्तवता आला नाही, असेही सांगण्यात येत आहे.

## गावरान आंबा होतोय दुर्मिळ; संकरित आंब्यांना आला भाव

आधुनिक केसरी न्यूज


गोकुळसिंग राजपूत

**सोयगाव :** तालुक्यात आजी-आजोबांनी केलेले व नैसर्गिक उगवण झालेल्या शेतातील गावरान आंबे मोठ्या प्रमाणावर कमी झाल्याने आमराया नष्ट होऊन गावरान आमरसाची चव दुर्मिळ झाल्याचे चित्र सावळदबारा ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे.

पूर्वी 'दादा लगाए आम और खाये पोता' या म्हणी प्रमाणे प्रत्येक गावागावात आमराया अस्तित्वात होत्या. प्रत्येक शेतकऱ्यांच्या बांधावर लागवड केलेली तर काही नैसर्गिक उगवण झालेली गावरान आंब्याची शंभर- पन्नास झाडे ताठ मानेने उभी होती. मात्र, अलीकडील काळात काही झाडे जुनी होऊन वाळून जात आहेत तर नवीन संकरित, कलमीकरण केलेली विविध जातींच्या आंब्याच्या झाडाची लागवड केली जात आहे. त्यामुळे सावळदबारा ग्रामीण भागात आता गावरान आंबे दुर्मिळ झाले. क्वचितच एखाद्या ठिकाणी गावरान आंब्याची झाडे दृष्टीस पडत असल्याचे चित्र आहे. शेंद्र्या, शेप्या, गोटी, दश्या, आदी नावाने ओळखली जाणारी गावरान आंब्याची झाडे व आमराया दुर्मिळ होत आहेत. पूर्वी खेड्यात एकमेकांच्या घरी आंबे देण्याची पद्धत होती. खेड्यातही ती अलीकडे राहिलेली दिसत नाही.फळांचा राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या गावरान आंब्याला आता उतरती कळा लागली असून पूर्वी घराघरांमध्ये गावरान आंबे पिकविण्यासाठी लगबग असायची. घरात प्रवेश करण्यापूर्वीच पिकविण्यासाठी टाकलेल्या गावरान आंब्याच्या आढ्यांचा सुगंध जिभेस पाणी आणत असे. पाहुणे आल्यावर त्यांच्यासमोर बादलीभर पाणी व टोपलेभर आंबे ठेवले जात. आमरस अन् पोळी हा विशेष पाहुण्यांचा पाहूणचाराचा खास मेनू असायचा. मात्र, हे सर्व कालबाह्य झाले. शंभर- दिडशे रुपये किलोप्रमाणे



आता फत्तेपूर बाजारातून आंबे खरेदी करून पाहुण्याची हौस भागवावी लागत आहे. आंब्यांना वातावरणाचाही फटका बसला आहे. गावरान आंबे दुर्मिळ झाले असून क्वचित ठिकाणी गावरान झाड कैऱ्यांनी बहरल्याचे चित्र आहे. मध्यंतरी अवकाळीचा फटका बसल्याने अनेक ठिकाणी आंबे गळून नुकसान झाले आहे. नवीन संकरित आंबे कृत्रिम रितीने पिकवलेले खाऊन हौस भागवावी लागणार आहे. तर सर्वांना आवडणारे नैसर्गिक रितीने घरी पिकवलेले गावरान आंब्याची चव चाखायला मिळणे कठीण झाल्याचे चित्र सोयगावात आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

या यज्ञाने तू संतुष्ट झाला असशील म्हणून प्रसादरूपी मागणे ( पसायदान ) तुझ्याकडे मागतो. जे मागितले ते स्वतःसाठी नाहीच. जगाच्या कल्याणासाठी. म्हणून तर आपण ' जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती, देह कष्टविती परोपकारे ' असे म्हणतो. ज्ञानेश्वर माउलींनी ' खळांची व्यंकटी सांडो ' असे मागणे मागितले म्हणजे दुष्टांचा दुष्टपणा, दुष्टप्रवृत्ती नष्ट होवो. माउलींच्या शब्दात एवढी ताकद होती की त्यांनी या जगातून दुष्ट लोक नष्ट होवोत असे मागणे मागितले असते तरी त्यांची मागणी पूर्ण झाली असती. पण लोकांच्या चांगुलपणावर माउलींचा विश्वास आहे. खलप्रवृत्ती एकदा नष्ट झाली की लोक चांगलेच वागतील. सज्जनांची मांदियाळी निर्माण होईल. या सृष्टीतील यच्चयावत प्राणी, माणसे एकमेकांचे मित्र होतील. असे झाले की माणसे जी काही मागणी परमेश्वराकडे करतील, ती चांगलीच असेल. तेव्हा अशा माणसांना ' जो जे वांच्छिल तो ते लाहो ' म्हणजे त्यांना हवं असेल ते दे अशी मागणी माउली करतात. हे पसायदान केवळ मराठी माणसांचं नाही, केवळ भारतीयांचं नाही. ते साऱ्या जगासाठी आहे. जातपात, धर्म, भाषा, प्रांत आदी सीमा ओलांडून अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी ते आहे. देव म्हणजे आकाशातील विस्तीर्ण पटामध्ये आपापल्या तेजानं झळाळणारे तारे असं म्हटलं तर त्या ताऱ्यांमधील सगळ्यात तेजस्वी तारा म्हणजे श्रीकृष्ण आहे असे म्हणता येईल. हाच पट भारतात श्रीराम, श्रीकृष्ण आणि शंकर ( महादेव ) यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनी आकर्षक आणि मजबूत असा विणला गेला आहे. श्रीकृष्ण, श्रीराम आणि शंकर यांची मंदिरं नाहीत किंवा पूजा होत नाही असा भाग भारतात क्वचितच आढळेल. त्यातही श्रीकृष्णाच्या जीवनाचा प्रभाव भारतातील कला, काव्य आणि सांस्कृतिक जीवनावर सर्वात जास्त आहे. अनेक कवी, महाकवी, लेखक यांना स्फूर्ती आणि प्रेरणा देणारे हे व्यक्तिमत्व ! लहानांपासून थोरांना आकर्षित करून घेणारे हे व्यक्तिमत्व.



## आनंदी पहाट

## भावनिकता व्यावहारिकदृष्ट्या घातकच

आधुनिक केसरी

सद्यःस्थितीत समाज माध्यमे, स्मार्ट फोन, मोबाईल नेटवर्क ह्यामुळे जनसंपर्क खूपच जलद होऊ लागला आहे. तंत्रज्ञान, संगणकीकरण, आधुनिकीकरण ह्याचा परिणाम जनमानसावर प्रचंड प्रमाणत झाला आहे. ह्याचा जितका उपयोग, फायदा होऊ लागला आहे, तितकाच त्याचा तोटा, नुकसान, फसवणूक होण्याचे प्रमाणही खूपच वाढत आहे. ह्या फसवणुकीच्या घटनांमुळे अनेकजणांना सावध, सतर्क व्हावे असे वाटत नाही. सुशिक्षित व्यक्तीच ह्यामध्ये मोठ्या रकमेच्या फसवणुकीच्या बळी पडल्याच्या घटना सतत घडतात. कदाचित, झटपट श्रीमंती हा त्या घटनांच्या मागील उद्देश असावा. ह्यांत बळी पडलेली आणि फसवणूक करणारी व्यक्ती परिणामांची जाणीव करून घेत नाही. समाज माध्यमातून आर्थिक फसवणूक झाल्याच्या अनेक घटना सातत्याने घडत असूनही आपण सावध न झाल्यामुळे सावज होत आहोत, त्याचे बळी पडत आहोत. फेसबुकच्या माधमातून मैत्री करून आर्थिक फसवणूक, प्रत्यक्ष भेटून मानसिक आणि शारीरिक शोषण, अत्याचार घडत असल्याचे सातत्याने आपण ऐकत, वाचत असतो. काहीवेळा तर काही जणांना स्वतःचा जीव देखील गमवावा लागल्याचे उघड झाले आहे. इमोशनमध्ये आडकायला काहीतरी नक्कीच भाग पाडत असते. संबंधीत व्यक्तीच्या इमोशन्स त्याच्या उणिवा ठरतात. दिवसेंदिवस वाढत चाललेल्या इमोशनल ब्लॅकमेलिंगच्या समस्येचा गांभीर्याने विचार होणे जरुरीचे आहे. मुळातच त्यासाठी, फसवणूक होऊ नये म्हणून सतर्क राहावे. पैसा कमवायला, जमवायला खूप वेळ लागतो, त्याच्या तुलनेने गमवायला काहीच वेळ लागत नाही. गमवलेला पैसा परत मिळवता येऊ शकेलही, परंतु तो कमवण्यासाठी गमवलेला वेळ मात्र परत मिळवता येत नाही. पैशाच्या बाबतीत लोभाचा विचार न करता लाभाचा विचार करणे जरुरीचे असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## उरे ते ईश्वर | ठायी ठायी ||

प्रेमाचे बंधन | जडावे मनाशी ||
मना तू बुध्दीशी | ऐक्य साध ||१||
भक्तीने करावा | कर्माशी शेजार ||
कर्माने उध्दार | जन्म होतो ||२||
परमार्थाचे बीज | संचितात रूजे ||
प्रारब्धात सजे | ज्ञानफळ ||३||
ज्ञानवंता शोभे | स्थितप्रज्ञ वृत्ती ||
ब्रह्मानंद प्राप्ती | मौन देते ||४||
ध्यान मग्न होता | सरते नश्वर ||
उरे ते ईश्वर | ठायी ठायी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

सुशोभा कुण्डलाभ्यां ते कर्णयोः वर्धिता ननु | तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || १६ ||
कुंडलांनी तुझ्या कानांचे आधीच असणारे सौंदर्य अधिक वाढवले आहे. अशा तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्गुरु सेव अनन्य से, अरु गुरु भेदिक ज्ञान । कर्म पाश दुख कटत है, मिटत मोह अज्ञान ।।२८।।(स्वर्वेद प्रथम मण्डल अष्टम अध्याय) ०१/०८/२८

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

सद्गुरूंची अनन्य शरण भक्ती आणि त्यांच्या अनुभव-योग-युक्तीद्वारे परमेश्वराची उपासना केल्यास जीवांच्या कर्म मोह-अज्ञान बंधनाचा नाश होतो. कर्म-बंधनाची बेडी तोडण्यासाठी आणि मोह-अज्ञान बंधनाच्या नाशासाठी एकमात्र सद्गुरूंची भक्ती आणि विहंगम योगाची अनुभव योग-युक्ती आहे. याद्वारेच परमेश्वराची प्राप्ती आणि त्रिताप दुःखाची निवृत्ती होते. सद्गुरू शरणात राहून प्रभू प्राप्ती व्यतीरिक्त मायेच्या निवृत्तीसाठी दुसरा कुठलाही उपाय नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सूक्ष्मभूतेंनिरूपण

आधुनिक केसरी

ईश्वरापर्यन्त पोहचण्यासाठी त्याने घालून दिलेल्या मार्गावरून चालणे हेच आपल्या हातात असते. ईश्वर ज्ञानी तर जी्व अज्ञानी असतो. ईश्वर म्हणतो की"विश्व माझ्यामध्ये आहे".तर जीव म्हणतो की मी विश्वामध्ये आहे. ईश्वर एवढा मोठ्ठा आहे की त्याच्यात विश्वाचा पत्ता लागत नाही. तर जीव एवढा लहान की विश्वात त्याचा पत्ता लागत नाही. सदैव आनंद देणारा व आनंदी असणारा ईश्वर आप्तकाम म्हणजे ज्याच्या वासना सर्वथैव त्रृप्त झालेल्या आहेत. तर सतत भयाने व्याकुळ झालेला. आता माझं कसं होणार माझ्या प्रपंचाचे कसे होणार ? या भयस्थितीत असणारा जीव अत्रृप्त काम म्हणजे ज्याच्या वासना सतत अत्रृप्त च असतात. त्या जीवाला पैसा आडका, धनदौलत, मुलेबाळे सगळं सगळं भौतिक सुख मिळालं तरी त्याची हौस किंवा लालसा काही संपतासंपत नाही. मामुस किंवा संपूर्ण धरतीवर जीव नावाचाच असा एक प्राणी आहे की तो कधीच समाधानी नसतो. मित्रांनो समाधान मिळण्यासाठी तरी सतत परमात्मा ला शरणं गेलं पाहिजे. सतत सन्मार्गाच्याच रस्त्यावर चालले पाहिजे. काम, क्रोध, मोह, मत्सर या तिन्ही वर विजय मिळवता आला पाहिजे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

गच्छ सूकर भद्रं ते ब्रूहि सिंहो मया जितः ।
पण्डिता एव जानन्ति सिंहस्त्रकरयोर्बलम् ||

सरलार्थ : एक दिवस एक रानडुक्कर सिहापुढे येऊन त्याला म्हणाला- 'आजवर मी सात सिंह ठार मारले आहेत. आज तुझी पाळी. चल माझ्याशी युद्ध कर. त्यावर सिंह त्याला हसून म्हणतो) 'हे डूकरा, इथून निघून जा. तुझं कल्याण असो. मी सिहाला FREE (लोकांना) खूशाल सांग. डूकराचं बळ काय आणि सिहाची ताकद काय हुशार लोक आणतातच. '


स्पष्टीकरण - शहाणी माणसे एखाद्या शुद्ध मूर्खापुढे वादविवादासाठी दंड थोपटत नाहीत. तीची उपेक्षाच करतात.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

## देवाकरिता स्वत:ला विसरावे

आधुनिक केसरी

तुम्ही स्वतःला दिवसातून एकदा तरी विसरता की नाही ? हल्ली आपण आपल्याला विसरतो, पण ते विषयाकरिता विसरतो. स्वतःला विसरावे, पण ते विषयाकरिता विसरू नये. एखादे वेळेस असे होते की, एखादी आनंदाची बातमी समजली म्हणजे आपण काय करतो हे आपले आपल्यालाच समजत नाही. अशा वेळी देह भानावर नसतो हेच खरे. त्याचप्रमाणे दुःखाची बातमी कळली म्हणजे होते. थोडक्यात म्हणजे, आपण जेव्हा विषयाच्या आधीन होतो, तेव्हा आपण देहाला विसरून विषय भोगतो. त्याचप्रमाणे क्रोधाचे होते. विषयासाठी देहभान विसरणे हे केव्हाही वाईटच; परंतु देवाकरिता जर आपण आपल्याला विसरलो, तर ते फारच उत्तम. भजन करीत असताना देहभाव विसरून भजन करावे. आपण आता तसे करतो का ? भजन म्हणत असताना कोणी ताल चुकला की लगेच आपण रागावतो; ते खरे भजन होत नाही. म्हणून भजन करावे आणि तशी सवय ठेवावी, म्हणजे देहभाव विसरता येईल. संसारात आपण कोण हे न विसरता संसार करावा;



म्हणजेच, विषयाच्या अधीन केव्हाही न होता संसार करावा. स्वतःची आठवण ठेवून प्रंपच केला तर तो आपल्याला बाधक व्हायचा नाही. व्यवहारात काम, क्रोध, लोभ वगैरे सर्व काही असावे, पण आपण त्यांच्या स्वाधीन न होता, त्यांना आपल्या ताब्यात ठेवून वागावे; म्हणजे देहभाव आपोआप नष्ट होऊन जाईल. हे सर्व साधायला, परमेश्वराला शरण जाणे हा एकच सोपा मार्ग आहे; आणि त्याकरिता नामस्मरणात राहणे हेच साधन आहे. कोणी बारा अन बारा चोवीस वर्षे साधनात राहूनही काही काम झाले नाही असे म्हणतात, आणि यात काही अर्थ नाही म्हणून सोडूनही देतात; तेव्हा अशा लोकांतच अर्थ नसतो, की गुरूत काही नसते ? तर आपले आपणच याला कारणीभूत असतो हे पक्के समजावे. संन्यास घ्यायचा असेल तर बायकोला बरोबर घेऊन संन्यास घेता येईल का ? त्याप्रमाणे, विषय बरोबर घेऊन गुरूकडे गेलो, तर गुरूची खरी भेट होईल का ? ती शक्य नाही. याकरिता, ते सांगतील ते साधन आधी करावे म्हणजे चित्त शुद्ध होते, आणि ते झाल्यावर त्यांची खरी भेट होते. म्हणून आपण त्यांच्याजवळ खरे समाधान मागावे. आणि ते मिळाल्यावर आणखी काय मिळवायचे राहते ? मग तो ज्या स्थितीत ठेवील त्यातच समाधान होते. देहभोगाची अशा वेळी काहीच किंमत राहात नाही, आणि मग त्याला कंटाळण्याचेही कारण उरत नाही.

**परमात्म्याचे स्मरण ।यातच विषयाचे विस्मरण ॥**



# अत्याचार, आक्रमक आंदोलन आणि न्याय

पान 4

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ९ जून २०२३



# शोभाताई घुंगरे यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन

पान 3


# नर्सिंग उमेदवारांना एमबीबीएसचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार : चंदुलाल बियाणी

## आरोग्य-मित्र-महाराष्ट्रच्या वतीने राज्यभर करण्यात येणार जनजागरण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बी. एससी. नर्सिंग उत्तीर्ण उमेदवारांना 'नर्सिंग अधिकारी' ही पदवी देण्याचा निर्णय 5 जून रोजी एका अधिसूचनेद्वारे जाहीर करण्यात आला आहे. त्यांना एमबीबीएसच्या बरोबरीचे समजून भविष्यात 'कनिष्ठ डॉक्टर' असे संबोधण्याचाही सरकारचा विचार आहे. भारतीय नर्सिंग परिषदेने हा निर्णय घोषित केला असून या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आरोग्य-मित्र-महाराष्ट्र संघटनेचे प्रदेशाध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी परिषद व केंद्र सरकारचे जाहीर आभार व्यक्त केले आहेत. नर्सिंग उमेदवारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यासाठी आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी विविध महत्त्वाच्या बैठकांनंतर हे निर्णय परिषदेचे सचिव लेफ्टनंट कर्नल डॉ. सर्वजीत कौर यांनी एका पत्रान्वये जाहीर केले आहेत. आरोग्य-मित्र-महाराष्ट्रच्या वतीने याबाबत राज्यभर जनजागरण करण्यात येणार आहे, असेही प्रदेशाध्यक्ष चंदुलाल बियाणी यांनी या वेळी सांगितले. भारतीय नर्सिंग परिषदेला पाठवण्यात आलेल्या आभार पत्रावर आरोग्य-मित्र-महाराष्ट्रचे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, प्रदेश सचिव डॉ. पापालाल बोरा, प्रदेश उपाध्यक्षा मंजूताई दर्डा, विभागीय कोषाध्यक्ष राधेश्याम झंवर, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष मनोज पाटणी, जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, बीड जिल्हाध्यक्ष संतोषकुमार जेथलिया, परभणी जिल्हाध्यक्ष मोहन धारासूरकर, प्रसिद्धीप्रमुख संजय व्यापारी, सोशल मीडिया प्रमुख संदीप घंटे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.






# हे तर गृहखात्याचे अपयश

## सुप्रिया सुळेंचा फडणवीसांवर निशाणा

आधुनिक केसरी न्यूज

**आळंदी :** कोल्हापूर आणि अहमदनगरमध्ये ज्या घटना घडल्या आहेत त्या गृहखात्याचे अपयश असल्याचे सुप्रिया सुळे यांनी म्हणत देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. महिला, स्त्रियांवरती अत्याचार होत आहेत. दुसरीकडे हे सरकार बेटी पढाव बेटी बचाव नारा देऊन नागरिकांची दिशाभूल करत आहे. असा टोला देखील त्यांनी शिंदे- फडणवीस सरकारला लगावला आहे. त्या आळंदीमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. अहमदनगर आणि कोल्हापूरमध्ये ज्या घटना घडल्या आहेत. ते गृह खात्याचे अपयश आहे. जर बंटी पाटील यांना अगोदरच अशा घटना होऊ शकतात हे कळत असेल आणि सरकारला कळत नसेल हे नक्कीच सरकारचे अपयश आहे असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. महिला, मुलींवर अत्याचार होत आहेत. दुसरीकडे बेटी बचाव बेटी पढाव चा नारा हे सरकार देत आहे.

दिल्लीमध्ये महिला कुस्तीपटूंना त्यांच्या हक्कासाठी आंदोलन करावे लागते आहे. दिल्लीतील सरकार कुस्तीपटूंना ज्या पद्धतीने वागवत आहे. त्याचा मी निषेध करते असं देखील सुप्रिया सुळे म्हणाल्या. दरम्यान, शरद पवार यांनी संभाजीनगरवर एक वक्तव्य केलं होतं त्या वक्तव्यावरील प्रश्नावर सुप्रिया सुळे पत्रकारावर भडकल्या. शरद पवार असं म्हणलेच नाहीत असं सांगत ते तुमच्या वडिलांच्या वयाचे आहेत. जे लोक अस म्हणत असतील त्यांना लाज वाटली पाहिजे असं देखील त्या म्हणाल्या आहेत.

# बँकेतून लुटले लाखो रुपये

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शहरात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्ये वाढ झाली आहे. शहरात विविध गुन्हे घडत आहेत. गुन्हेगारांना पोलिसांची भीती आहे की नाही ?, असा प्रश्न निर्माण झाला आहे. असाच एक धक्कादायक प्रकार पुण्यात घडला आहे. पुण्यातील कोंढवा येथील गर्दीच्या चौकात असलेल्या बँकेतून दिवसाढवळ्या दोन लाख रुपये घेऊन चोर पसार झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अक्षय गोटे ( वय 38 वर्षे, धंदा रियल इस्टेट, रा. सी 308 अलकसा सोसायटी महमदवाडी ) यांनी कोंढवा पोलीस स्टेशन इथे फिर्याद दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरदिवसा हा प्रकार घडल्यामुळे खळबळ उडाली आहे.

फिर्यादी अक्षय गोटे हे रियल इस्टेटचा व्यवसाय करतात. जागेच्या व्यवहारातून अक्षय गोटे याला 2 लाख रोख कमिशन मिळाले होते. आज सकाळी पाऊणे अकरा वाजण्याच्या सुमारास दोन लाख रुपयांची ही रोख रक्कम घेऊन पत्नी कविता गोटे हिचे अकाऊंट असलेल्या इन्डसइन्ड बँक, ज्योती हॉटेल चौक, कोंढवा पुणे या शाखेतील अकाऊंटमध्ये जमा करण्यासाठी गेले होती. बँकेमधील पैसे भरण्याची स्लिप घेऊन त्यावर माहिती भरत असताना फिर्यादी याच्याजवळ एक अनोळखी इसम आला. त्याने फिर्यादीला मी बँकेतील कर्मचारी असून आम्हाला एटीएममध्ये पैसे भरायचे आहेत. तुमची स्लिप लवकर भरा असे सांगितले आणि हा माणूस काऊंटर येथे जाऊन तिथल्या महिला कर्मचाऱ्याशी बोलू लागला. त्यानंतर फिर्यादी पैसे भरण्याची स्लिप भरत असताना पुन्हा तो माणूस आला आणि मला पैसे द्या असं सांगितलं. तेव्हा हा व्यक्ती बँकेतील कर्मचारी असल्याचं फिर्यादीला वाटलं. त्यानंतर राहुल गोटे यांनी ते पैसे त्याला दिले आणि ते स्लिप भरु लागले.

# पिलीव परिसरात बिबट्याची एंट्री : नागरिक भयभीत

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव परिसरातील झिंजेवस्ती, कुसमोड, काळमवाडी या परिसरात बिबट्या सारख्या प्राण्यांचा वावर होत असल्याचे नागरिकांना दिसून आल्याने वाड्यावस्त्यावर व शेतात राहणाऱ्या शेतकरी ग्रामस्थांतून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काल गुरुवार दिनांक 7 जून 2023 रोजी सायंकाळच्या वेळेला 7 वा. सुमारास 65 फाट्याला बिबट्यासारखा प्राणी दिसल्याचे वन खात्याच्या कर्मचाऱ्यांना कळविण्यात आले होते. त्यांनी घेतलेल्या माहितीवरून व घेतलेल्या ठशावरून बिबट्याचा वावर या भागात असल्याचे निष्पन्न केले आहे. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कुसमोड शिवारातील अमर लवटे, शिवाजी सरगर, जगदीश गायकवाड, वैभव वगरे यांनी बिबट्या पाहिल्याचे या सांगितले आहे. त्याप्रमाणे वन खात्याच्या कर्मचाऱ्यांनी या भागात पाहणी करून ठशाची पाहणी करून हे ठसे बिबट्याचेच आहेत का याची पडताळणी करण्यासाठी वरिष्ठाकडे पाठविण्यात आले आहेत. या बिबट्यापासून त्रास होऊ नये म्हणून जागरूक राहून सावधानता बाळगावी असे आवाहन ग्रामसुरक्षा यंत्रणेमार्फत पोलीस पाटील विकास सरगर पत्रकार सुजित सातपुते यांनी फोन ॲपद्वारे आव्हान केले आहे मात्र या परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कृषी पंपांना विद्युत पुरवठा बऱ्याचशा फीडर वरून रात्रीच्या वेळेला केला जातो. त्यामुळे मोटारी चालू करायला जाण्यासाठी व दारे धरण्यासाठी पिकाला पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये भीती निर्माण झाली आहे. म्हणून शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा विद्युत पुरवठा व्हावा अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.





# वाळूडेपो खुलताबाद तालुक्यात सुरू करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या नवीन वाळु निर्मिती धोरणानुसार राज्य सरकार मान्य वाळु डेपोमध्ये वाळुचा साठा करून त्यातुन ग्राहकांना प्रती ब्रास 600 रू दराने वाळु पुरवठा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात चार वाळु डेपो प्रस्तावित असल्याचे समजते. खुलताबाद तालुक्यात गोरगरीबव जनतेची घरकुल व ईतर कामे सुरू आहेत खुलताबाद तालुक्यातील जनतेची वाळुची मागणी लक्षात घेता खुलताबाद तालुक्यात वाळु डेपो सुरू करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी आज जिल्हाधिकारी साहेब व तहसिलदार सुरेंद्र देशमुख साहेब याच्याकडे भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यानी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# फुलंब्री तालुका संनियंत्रण कक्ष स्थापन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शेतकऱ्यांना बि बियाणे खते व कीटकनाशके वेळेवर आणि शासनमान्य दरात मिळावी यासाठी कृषी विभाग फुलंब्री मार्फत सनियांत्रन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.सदर नियंत्रण कक्ष प्रमुख मंडळ कृषी अधिकारी श्री निवृत्ती जोरी असून त्यांचा मोबाईल क्रमांक 9423180393 असा असून शेतकऱ्यांनी तालुक्यात कुठेही कृषी केंद्र बाबत तक्रार असल्यास त्यांना सम्पर्क करावा असे आवाहन तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी केले आहे.सदर नियंत्रण कक्ष मधे पंचायत समिती कृषी अधिकारी आर. एम. बेंबरे, विस्तार अधिकारी जी. ए.पवार तसेच कनिष्ठ लिपिक विखार शेख यांचा समावेश आहे.







# तोडगा निघाला

आधुनिक केसरी

गेल्या काही महिन्यांपासून भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधात कुस्तीपटूंनी तीव्र आंदोलन केले आहे. सात महिला कुस्तीपटूंनी त्यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. यासंदर्भात राजधानी दिल्लीमध्ये महिला कुस्तीपटूंबरोबरच अनेक पुरुष कुस्तीपटू, प्रशिक्षकही सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले. या कुस्तीपटूंनी देशातून आणि विदेशातूनही मोठा पाठिंबा मिळू लागला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बुधवारी केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर आणि आंदोलक कुस्तीपटूंमध्ये तब्बल सहा तास झालेल्या चर्चेत तोडगा निघाल्याचे समोर आले आहे. यासंदर्भात स्वत: अनुराग ठाकूर यांनी माध्यमांना सविस्तर माहिती दिली आहे. काही दिवसांपूर्वी कुस्तीपटू आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यामध्ये रात्री उशीरा तब्बल दोन तास बैठक झाली. यावेळी दोन्ही बाजूंकडून नेमकी काय चर्चा झाली, यासंदर्भात अधिकृत माहिती जाहीर करण्यात आली नाही. मात्र, बुधवारी अनुराग ठाकूर यांनी कुस्तीपटूंना चर्चेसाठी पुन्हा पाचारण केल्याचं सांगितल्यानंतर या घडामोडींचा उलगडा झाला. जवळपास सहा तास आंदोलक आणि अनुराग ठाकूर यांच्यात बैठक झाल्यानंतर संध्याकाळी त्यांनी यासंदर्भात माध्यमांना माहिती दिली. आंदोलक कुस्तीपटू आणि केंद्र सरकार यांच्यामध्ये झालेल्या बैठकीमध्ये अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सहमती झाली. अनुराग ठाकूर यांनी दिलेल्या माहितीनुसार, ब्रिजभूषण सिंह यांच्यावर लावण्यात आलेल्या आरोपांबाबत तपास पूर्ण करून १५ जूनपर्यंत चार्जशीट दाखल केली जावी, भारतीय कुस्ती महासंघाची निवडणूक ३० जूनपर्यंत घेतली जावी, कुस्ती महासंघाची अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली जावी, समितीच्या अध्यक्षपदी महिला असावी, निवडणूक होईपर्यंत आयओएच्या अ‍ॅड हॉक कमिटीवर दोन प्रशिक्षकांची नियुक्ती केली जावी, निवडणुका होतील तेव्हा त्यावर चांगले पदाधिकारी निवडून यावेत यासाठी खेळाडूंशी चर्चा केली जावी, माजी अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्या तीन टर्म पूर्ण झाल्या असून ते स्वत: किंवा त्यांच्याशी संबंधित व्यक्ती निवडून येऊ नये अशा कुस्तीपटूंच्या प्रमुख मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. “ज्या खेळाडूंच्या, आखाड्यांच्या, प्रशिक्षकांच्या विरोधात गुन्हे दाखल झाले आहेत, ते मागे घेतले जावेत. १५ जूनपर्यंत चार्जशीट दाखल होईपर्यंत खेळाडू आंदोलन करणार नाहीत, अशी माहितीही अनुराग ठाकूर यांनी दिली. दरम्यान, एकीकडे सहमतीने अटी मान्य झाल्याचं सरकारकडून सांगण्यात आले असताना कुस्तीपटूंनी दुजोरा दिला आहे. मात्र, १५ जूनपर्यंत सरकारने आपल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही, तर पुन्हा आंदोलन सुरू करणार असल्याची भूमिका कुस्तीपटूंनी घेतली आहे.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# प्रत्यक्षाहुनी प्रतिमा धुरकट!

आधुनिक केसरी

**सध्या कनिष्ठ डॉक्टराचा संप, वरिष्ठ डॉक्टरांचे राजीनामे हे प्रकरण गाजते आहे. या निमित्ताने सोशल मीडियावर चांगलाच धुरळा उडतो आहे. आपल्याला यात कोण खरे, कोण खोटे या वादात पडायचे नाही. न्यायधीश तर मुळीच व्हायचे नाही. कारण प्राध्यापक विद्यार्थी यांच्यातील हे वाद, संघर्ष नवे नाहीत. ते पूर्वापार चालत आले आहेत. द्रोणाचार्य, एकलव्य, अर्जुनाची कथा आठवा. म्हणजे समजेल. प्राध्यापकाच्या प्रतिष्ठेच्या आड काही आले तर तेही कोणत्या स्तराला जाऊ शकतात, खास करून पी एच डी संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना कसे वेठीस धरतात याच्या सुरस चमत्कारिक कथा खूप आहेत. दुर्गा भागवत या विदुषीची पदवी त्याच्या मार्गदर्शकानेच अडवली होती.**




त्यांची बहीण कमला सोहनी यांना प्रवेश नाकारणारे शास्त्रज्ञ डॉ. सी.वी. रामन होते! अशी अनेक उदाहरणे देता येतील. काही बाहेर येतात. काही दडपली जातात.

प्राध्यापक स्वतःला ग्रेट समजतात. पी.जी., पी.एचडी. च्या थेसिस साठी मार्ग दर्शन करताना, परीक्षेच्या वेळी छळ सुध्दा करतात. मेडिकल, इंजिनियरिंग, आर्किटेक्चर अशा विषयात, जिथे प्राध्यापक, परीक्षक यांच्या हाती बरेच (सारेच) काही असते, तिथे या छल छावण्या मोठ्या प्रमाणावर असतात. दोष अर्थातच विद्यार्थ्यांना दिला जातो.विद्यार्थी दोषी नसतातच असे नाही. टाळी दोन्ही हातांनीच वाजते! गुण कमी देणे, घरची, खाजगी कामे करून घेणे, संशोधन प्रसिध्द करताना स्वतःच्या नावावर सारे खपविणे, काही काम विद्यार्थ्या ने केले असेल तरी त्याला श्रेय न देता पुरस्कारासाठी स्वतःचेच नाव पाठवणे हे प्रकार सरास चालतात. अगदी नोबेल पुरस्कार देखील याला अपवाद नाहीत. लिझ माईटणर ला अनेकदा नामांकन लाभून देखील हा पुरस्कार मिळाला नाही. तिच्या सहकार्याने मात्र तो पटकावला!

प्रसिध्दी ची देखील एक नशा असते. त्यामुळे प्रकाशित रिसर्च पेपर्स ची,गाईड केलेल्या विद्यार्थ्यांची, मिळालेल्या पुरस्काराची, डॉक्टरांच्या बाबतीत केलेल्या ऑपरेशन ची संख्या देखील बायोडेटा फुगविण्यासाठी महत्वाची असते. ही नशा दारू सिगरेट च्या नशे पेक्षाही घातक असते. ती तुम्हाला तर मानसिक आजारी करतेच, पण तुमचे विद्यार्थी, तुमचे कुटुंब, मित्र यांना देखील लागण होते. कमी अधिक प्रमाणात तेही प्रभावित होतात तुमच्या बरोबर. तुमच्या नकळत!

मला आठवते,आम्ही आयआयटीत पी.एचडी.चे संशोधन करीत असताना आमचे गुरू, त्यांचे गुरू यांनी एका राष्ट्रीय पुरस्कारा साठी अर्ज केला. त्यात बहुतेक संशोधन आम्हा विद्यार्थ्यांच्या कामावर आधारले होते. पण श्रेय मात्र वरिष्ठ प्राध्यापकांना घ्यायचे होते. त्यातले माझे गुरू या कृतीने अस्वस्थ झाले होते. पण त्यांच्या गुरू पुढे त्यांचा नाईलाज होता! त्यांनी मला तसे बोलून दाखवले. हे पारितोषिक या प्राध्यापक मंडळींना मिळाले नाही हा भाग वेगळा.पण प्राध्यापकाच्या कोत्या मनोवृत्तीचे दर्शन आम्हालाही अनुभवाला आले. इथे सर्व दोष प्राध्यापकाचाचअसतो असे मुळीच सुचवायचे नाही. गेल्या काही दशकांत विद्यार्थ्यांची, पालकाची मनोवृत्ती पार बदलली आहे. ज्ञानार्जनासाठी शिक्षण ही धारणा मागे पडली. लठ्ठ पगारा साठी पदवी हा कन्सेप्ट वाढीला लागला आहे. somehow, म्हणजे कसे तरीशिक्षण, कशीतरी पदवी, कशीतरी नोकरी हा जुगाड वाढला आहे. विद्यार्थी वर्गात येत नाहीत, प्रॅक्टिकल करीत नाहीत, प्रोजेक्ट, सेमिनार गांभीर्याने घेत नाहीत. प्रबंधावर मेहनत घेत नाहीत.ट्री त्यांना गुण, चांगली श्रेणी, हे सारे हवे आहे. मेहनत न करता. इथेही चांगल्या, परिश्रमी विद्यार्थ्यांचा अपवाद आहे. पण ते अल्प सांख्यांक आहेत! मेजोरिटी सेटिंग, जुगाड करणाऱ्याची आहे. साहजिकच गंभीर, प्रामाणिक प्राध्यापकांना वैताग येतो. कधी कधी त्यांचा ही तोल जातो. शिक्षक सांगतात ते त्याच्या भल्यासाठीच हे त्यांना कळत नाही. पालकांनाही कळत नाही.दोष प्राध्यापकाच्या माथी जातो. व्यवस्थेला दोष दिला जातो.या संग्रहात अनेकदा जाती, धर्म, पक्ष याचे राजकारण आले की मग विचारायलाच नको. प्रकरण वाटेल त्या दिशेने वाहवत जाते. आता त्यात आणखीन एक एलिमेंट जोडायला हवा – मीडियाचा आगीत तेल घालण्याचे काम काही निवडक मीडिया छान करतात. खरी बाजू मांडणारे, शोध पत्रकारिता करणारे ही आहेत. पण त्या मानाने कमी! अशा वादात कोणतीही एक बाजू घेणे, दुसऱ्याला दोष देणे केव्हाही चुकीचे. पुढे पाऊल टाकायचे तर प्रत्येकालाच एक पाऊल मागे घ्यावे लागते. एकमेकांना समजून घ्यावे लागते. चर्चेने च प्रश्न सुटतात. आंदोलनाने नाही. वसती गृहाच्या दुरावस्था,शिष्य वृत्ती वेळेवर न मिळणे, काही प्राध्यापकांनी नीट सिरीयसली न शिकवणे, tutorials, प्रॅक्टिकल कनिष्ठ प्राध्यापकांवर धकलणे, पेपर्स नीट न तपासणे, काही विद्यार्थ्यांवर अन्याय करणे या तक्रारीत तथ्य असते. प्रशासनाने, सरकारने प्रकरण चिघळण्या पूर्वीच यात लक्ष घालायला हवे. दोन्ही बाजू ऐकून निष्पक्षन्याय देणारी यंत्रणा प्रत्येक संस्थेत सजग हवी. त्यातले सभासद गरजे नुसार,समस्ये नुसार बदलायला हवेत. मोनोपली टाळण्यासाठी. संप, आंदोलने, राजीनामे यांनी प्रश्न कायमचे सुटत नाहीत. तात्पुरती मलमपट्टी केली जाते. ती वेळ निभावून नेली जाते. आजचे मरण उद्यावर ढकलले जाते असेच म्हणायला हवे. समस्येच्या मुळाशी जाण्याची गरज असते खरे तर! तीच ती परिस्थीती पुनः उद्भावायला नको. तेच प्रश्न पुनः निर्माण व्हायला नकोत. पण व्यवस्थेला,सरकारला ते करायचे नसते. कारण कायमचे प्रश्न सुटले, तर व्यवस्थेला,सरकारला कामच उरणार नाही. त्यांना तर आम्ही खूप काम केले,बरेच प्रश्न सोडवले, (आधीच्यानी काहीच केले नाही!) हे दाखवायचे असते. त्यामुळे मूळ समस्या वर्षानुवर्षे तशाच राहतात. आयी बात समझमे??



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# बालविवाह समस्येचे उच्चाटन व्हावे !

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. एका सर्व्हेनुसार महाराष्ट्रात बाल विवाहाचे प्रमाण ३० टक्के इतकी आहे. ही आकडेवारी महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. बीड जिल्ह्यात बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली शिवाय मे महिन्यात ३३ बालविवाह बालकल्याण समितीने थांबवले ही देखील बातमी वर्तमानपत्रात वाचली.**

हे बाल विवाह रोख्यण्यात प्रशासनाला यश आले याबाबत प्रशासनाचे अभिनंदन करायला हवे मात्र प्रत्येक वेळी प्रशासनाला बाल विवाह रोखण्यात यश येतेच असे नाही अनेकदा प्रसशासनाच्या डोळ्यात धूळफेक करून बाल विवाह लावण्यात येतात. पाचव्या आरोग्य कुटुंब कल्याण सर्व्हेक्षण अहवालानुसार राज्यात राज्यात सर्वाधिक बालविवाह होणाऱ्या दहा जिल्ह्यात मराठवाड्यातील आठ जिल्हे आहे. बीड जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. अन्य जिल्ह्यातही अशा घटना अधूनमधून उघडकीस येतात. काही बालविवाह पारही पडत असतील ज्यांची तक्रार किंवा माहिती समितीपर्यंत पोहचत नसेल. महाराष्ट्राचे महिला व बाल विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी नुकतेच विधान परिषदेत सांगितले की, राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील तीन वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या १२, २५३ इतकी आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुणे मुंबई सारख्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. मात्र सरकारने मंजूर केलेल्या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकलावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वांनाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पिशोर पोलिस निरीक्षक कोमल शिंदे, कर्मचाऱ्यावर कारवाई करा

## कारवाई न झाल्यास आठ दिवसानंतर उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील पिशोर पोलिस ठान्याच्या सहायक पोलिस निरीक्षक कोमल शिंदे यांच्या सोबत चार पोलिस कर्मचाऱ्यावर तत्काळ कारवाई करावी अशी मागणी निवेदना द्वारे जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष सय्यद मुजाहेद अली यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी, व तहसील कार्यलय कन्नड यांचे कड़े मागणी करण्यात आली आहे, या मध्ये म्हणटले आहे की, शेलगाव ता. कन्नड येथे दि 29मे रोजी झालेल्या दोन गटातील भांडणात संशयास्पद शबाना पटेल या महिलेस पिशोर पोलिस निरीक्षक कोमल शिंदे व चार पोलिसांकडून अमानुषपणे सुडबुद्दिने मारहाण करण्यात आली. संबंधित महिलेला जनावरासारखा जबर मार दिला आहे, आंगाचे कातडे निघेपर्यंत मुक्का मार, लाठ्याचा मार देत असतांना यांची गय आली नाही का? खाकीचा धाक दाखवत अंगाला शहारा येईल इतके मारहाण करने योग्य आहे का? असा प्रश्न परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहे,



पोलिसांच्या या मनमानीला आळा घालण्यासाठी व सदरील घटनेची उच्च स्तरावर चौकशी करण्यासाठी भांडणाच्या अनुषंगाने चौकशी समिति नेमण्यात यावी व पोलिस निरीक्षक कोमल शिंदे व इतर 4 पोलिसांवर कारवाई करण्यात यावी, तसेच आजपासून पुढील 8 दिवसात चौकशी समिति नेमण्यात आली नाही व पोलिस निरीक्षक कोमल शिंदे व इतर 4 पोलिसांवर कारवाई करण्यात आली नाही तर आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे जिल्हा कोंग्रेस कमिटी अल्पसंख्याक जिल्हा उपाध्यक्ष सय्यद मुजाहेद अली यांनी देण्यात आला आहे. तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या वर वरिष्ठ स्थरावरुन काय कार्यवाही होईल याकडे नागरिकांचे लक्ष वेधले आहे.

या प्रकरणात संबंधित पोलिस अधिकाऱ्यांची तसेच अंमलदारांची चौकशी करण्याचे आश्वासन विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण यांनी खासदार इम्तियाज जलील यांना दिले. या आश्वासनानंतर खासदार जलील यांनी कन्नड मोर्चा तूर्तास स्थगित करण्याची घोषणा केली. महिलेला बेदम मारहाण प्रकरणी पोलिसांनी केलेले कृतेचा व चार पोलिस कर्मचाऱ्यांविरोधात सखोल चौकशी करून कडक कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी खासदार जलील हे कन्नड येथे मोर्चा काढण्यात येनार असल्याची घोषणा केली होती. या प्रकरणात विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ . ज्ञानेश्वर चव्हाण , पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया व अतिरिक्त पोलिस अधीक्षक सुनील लांजेवर यांनी संबंधित पोलिसांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. या प्रकरणात विहित मुदतीत सखोल चौकशी करून दोषी पोलिसांविरोधात खासदार इम्तियाज जलील यांनी पोलिसांच्या क्रूरतेचा निषेध करून पीडितेचे फोटो राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, महिला आयोग आणि पोलिस महासंचालकांना पाठवले आहेत. कडक कायदेशीर कारवाई न झाल्यास आगामी काळात लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही खासदार जलील यांनी दिला आहे . खासदार जलील यांच्यासोबत झालेल्या चर्चेदरम्यान विशेष पोलिस महानिरीक्षक, पोलिस अधीक्षक व अतिरिक्त पोलिस अधीक्षक यांनी सांगितले, ' संबंधित स्थानिक पोलिसांनी चुकीची माहिती देऊन वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची दिशाभूल केली. घडलेल्या प्रकरणाबाबतची सविस्तर माहिती लपविली.

# आधी तुकडे केले, मग कुकरमध्ये शिजवले

आधुनिक केसरी न्यूज

दिल्लीच्या श्रद्धा वालकर हत्याकांडानंतर मुंबई जवळच्या मिरारोडमध्ये ही मानवतेला काळीमा फासणारी घटना घडली आहे. लिव इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या आपल्या पार्टनरची निघृण हत्या करुन तिच्या शरीराचे तुकडे तुकडे करुन विल्हेवाट लावण्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने लिव्ह इन पार्टनरच्या मृतदेहाचे तुकडे प्रेशर कुकरमध्ये टाकून शिजवले. सध्या आरोपीला पोलिसांनी अटक केली असून सदर प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तसेच, आरोपीने हत्येसाठी वापरलेले सर्व साहित्य पोलिसांनी जप्त केले आहे. मीरा-भाईंदरच्या या घटनेने पुन्हा एकदा देश हादरुन गेला आहे. मीरा-भाईंदरच्या उड्डाणपूलाच्या शेजारी गीता आकाशदिप या सोसायटीच्या 'जे' विंगमधील सदनिका क्रमांक 704 मध्ये ही निर्घुण घटना घडली. या इमारतीतील घरात मनोज साने ( वय 56 ) आणि त्याची लिव इन पार्टनर मयत सरस्वती वैद्य ( वय 32 ) हे दोघे राहत होते. 2017 पासून हे जोडपे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. शेजाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे जोडपे जास्त कुणाशी बोलत नव्हते. सोसायटीच्या कार्यक्रमांमध्येही सहभागी होत नसे. दोघेही सकाळी मॉर्निंग वॉकला जातना दिसायचे. तसेच, संध्याकाळी बाहेर आल्यावर सोसायटीच्या परिसरातील कुत्र्यांना बिस्किट वैगेर खाऊ घालायचे. सोसायटीच्या सेक्रेटरींनी सांगितल्याप्रमाणे, मनोज बोरीवली येथे दुकानात काम करायचा. तर सरस्वती ही घरीच असायची. दोघेही ज्या खोलीत राहत होते. ती खोली मीरा-भाईंदरच्या आमदार गीता जैन यांच्या मालकिच्या सोनम बिल्डर या कंपनीची आहे. आपण मनोजला भाड्यानं रुम दिला असून, याबाबत सर्व कायदेशीर प्रक्रिया ऑफिसमधील कर्मचाऱ्यांनी केल्या असल्याचे गीता जैन यांनी सांगितले आहे. विकृत मनोजने लिव इन पार्टनर सरस्वतीची हत्या 4 जून रोजी केली होती. हा नराधम सरस्वतीच्या मृतदेहाची विल्हेवाट तब्बल तीन दिवस लावत होता. इमारतीत राहणाऱ्या शेजारांना मनोज आणि सरस्वती राहत असलेल्या खोलीमधून दुर्गंधी येऊ लागली. शेजाऱ्यांनी याबाबत पोलिसांत धाव घेतली आणि नयानगर पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली. नयानगर पोलीस सायंकाळी आठच्या सुमारास घरात प्रवेश केला, त्यावेळी या भयानक घटनेचा खुलासा झाला. घटनास्थळावरुन आरोपी मनोज साने याला ताब्यात घेतलं. पोलिसांसोबत काही तक्रारदार शेजारीही घरात गेले होते. त्यावेळी तीन बादल्यांमध्ये मृतदेहाचे तुकडे होते. सोबतच झाडं कापण्यासाठी वापरण्यात येणारी कटर मशीनही होती, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. दरम्यान, नयानगर पोलिसांनी मनोज साने याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला आहे आणि त्याला अटकही केली आहे.

सगळे चांगले चाललेले मात्र या दोघांत मध्यतंरी किरकोळ कारणावरुन भांडण होत होती . त्यात 29 जून 2023 पासून मनोजचे रेशनिंग दुकानाचे काम बंद झाले होते . तो घरीच होता . 4 जून रोजी सकाळच्या सुमारास दोघांमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाला . यातून मनोजने सरस्वतीची हत्या केली आणि मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी मनोजने झाड कापण्याची कटर मशीन घेऊन आला . सरस्वतीच्या संपूर्ण शरीराचे तुकडे तुकडे केले . एवढंच नाही तर तिचे शीरही मनोजने सोडले नाही . त्याने सरस्वतीच्या शरीराचेही कटर मशीनच्या मदतीने तुकडे केले . पोलिसांनी सध्या मृतदेहाचे तुकडे ताब्यात घेऊन जेजे रुग्णालयात तपासणीसाठी पाठवले आहेत . याचा अहवाल आल्यानंतर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळणार आहेत .

# दरेगाव येथे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

आधुनिक केसरी न्यूज

**दरेगाव :** महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल दरेगाव येथे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण खुलताबाद तालुक्यातील दरेगाव येथील महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल दरेगाव येथे पर्यावरण दिनानिमित्त शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणारी शाळा म्हणून महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल ने नावलौकिक मिळवलेला आहे. या शाळेने आंबा ,आवळा, सिताफळ, साग ,लिंब, चिंच, चीचोरा, वड ,पिंपळ, सिसम, कांचन, इत्यादी विविध प्रजातीच्या झाडांची लागवड करून शाळेचा परिसर हा घनदाट झाडांनी व्यापला आहे. या शाळेने झाडांचे जतन आणि संवर्धन चांगल्या प्रकारे केले असून यामुळे शाळेचा परिसर रमणीय व सुंदर दिसत आहे. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रकाश वेताळ यांनी झाडे लावा झाडे जगवा प्रत्येक नागरिकांनी आपल्या शेताच्या बांधावर कमीत कमी एक झाड लावावे व त्याची जतन करावी यामुळे शेतीसाठी झाड ही महत्त्वाची आहेत त्यामुळे शेतीचा पोत सुधारतो व झाड ही सर्व काही देण्याचा प्रयत्न करतात व आपण देणाऱ्या वरच कुऱ्हाडीचा घाव घालतो तो घालू नये असा संदेश दिला. प्रभाकर घोंगटे वनरक्षक सामाजिक वनीकरण खुलताबाद एकनाथ विटेकर वनसेवक, राजेंद्र बारगळ हे सामाजिक वनीकरण खात्याचे कर्मचारी यांनी शाळेचा परिसर पाहून समाधान व्यक्त केले. शाळेतील शिक्षक किरण ताकटे विश्वास निळ संजय भरत काळे देवकर श्रीमती रंजना गायकवाड तसेच शाळेतील विद्यार्थी हजर होते.






नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

महाराष्ट्र Business Katta












# क्रांतिकारक बिरसा मुंडा



माधव बैलकवाड
संपर्क 9545013082

आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ - ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला.**

या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक



कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

बिरसाचे सन १८८६ ते १८९० या काळात चैबासा येथे वास्तव्य होते. हा कालावधी जर्मन आणि रोमन कॅथोलिक ख्रिश्चन आंदोलनासाठी ओळखला जातो. त्यामुळे सुगन मुंडा यांनी शाळेतून आपला मुलाचे-बिरसाचे नाव काढून घेतले होते. चैबासा हे तत्कालीन सरदारांच्या राज्याच्या राजधान्यांपासून फार दूर नव्हते. सरदारांच्या आंदोलनांत इंग्रज शिपायांनी बिरसाला अशा प्रकारे पकडले की त्याच्यावर धर्मविरोधी आणि सरकारविरोधी शिक्का मारला गेला. १८९० मध्ये चैबासा सोडून दिल्यानंतर बिरसा आणि त्याचे कुटुंबाने जर्मन मिशनचे सदस्यत्व सोडून दिलेली. सरदारांच्या विरोधात आदिवासी ख्रिश्चन होऊ लागले आणि त्यामुळे भारत छोडो आंदोलनाबरोबरच बिसा मुंडा त्याच्या मूळ पारंपरिक आदिवासी धार्मिक व्यवस्थेकडे वळला.

वाढत्या सरदार आंदोलनामुळे त्यांनी कोर्बेरा सोडला. पोराहाट परिसरातील पेरींगच्या गिडियूनच्या नेतृत्वाखालील संरक्षित जंगलात मुंडाच्या पारंपारिक अधिकारांवर केलेल्या निर्बंधांवर लोकप्रिय असहिष्णुतेमुळे झालेल्या आंदोलनात त्यांनी भाग घेतला. १८९३-९४ च्या दरम्यान गावांमध्ये सर्व कचऱ्याची जमीन, ज्याची मालकी सरकारमध्ये निहित होती, १८८२ च्या भारतीय वन अधिनियम ७ च्या अंतर्गत संरक्षित जंगलात गृहीत धरली गेली. सिंहभाममध्ये पलामू आणि मानभूमप्रमाणे जंगल वस्ती सुरू करण्यात आली आणि उपाय योजण्यात आले. वन-निवासी समुदायांचे हक्क निश्चित करण्यासाठी घेतले. जंगलातल्या गावांना सोयीस्कर आकाराच्या ब्लॉकमध्ये ठळक केले गेले आहे ज्यामध्ये फक्त गावांचीच नव्हे तर खेड्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी लागवड योग्य आणि कचरा जमीन देखील आहे. १८९४ मध्ये, बिरसा एक शक्तिशाली तरुण, हुशार आणि बुद्धिमान बनले आणि बऱ्याचदा गारबरा येथील डंबरी टॅंक दुरुस्त करण्याच्या कामाचे कार्य केले.

सिंघममधील शंकरा गावातील शेजारच्या परिसरात त्याला एक उपयुक्त साथीदार सापडला, त्याने तिच्या पालकांना दागदागिने घातली आणि विवाहाच्या कल्पनाबद्दल समजावून सांगितले. नंतर, तुरुंगातून परतल्यावर तिचा दुर्दैवाने मृत्यू झाला. चळकड येथे त्याची सेवा करणाऱ्या आणखी एक महिला माथीस मुंडाची बहीण होती. तुरुंगातून सोडल्यानंतर कोळी मुंडा यांनी ठेवलेल्या कोनेसरच्या मथुरा मुदा यांची मुलगी आणि जिरीच्या जगगाव मुंडे यांच्या पत्नीने बिरसाची पत्नियां बनवण्याचा आग्रह धरला. त्याने त्यांना धमकावले आणि जगगाव मुंडे यांची बायको आपल्या पतीला दिली. बिरसा बरोबर राहिलेली आणखी एक सुप्रसिद्ध स्त्री बरुदीहची साली होती. बिरसा यांनी आपल्या जीवनात नंतरच्या एका टप्प्यावर एकाग्रतावर भर दिला. बिरसा शेतकऱ्यांमधील सर्वात कमी दर्जाच्या गुलाबांमधून उगवला, जो त्यांच्या नावे इतरांपेक्षा वेगळा होता, मुंदारी खुंटकट्टी व्यवस्थेमध्ये फारच कमी अधिकारांचा आनंद घेतात; संस्थापक वंशाच्या सदस्यांनी सर्व विशेषाधिकारांचे एकाधिकार केले होते, परंतु शेती-उत्पादकांपेक्षा ही रित्या चांगली नव्हती. नोकरीच्या शोधात ठिकाणाहून चालत असलेल्या लहान मुलाच्या रूपात बिरसाचा स्वतःचा अनुभव, त्याला शेतीविषयक प्रश्न आणि वनविषयक बाबींमध्ये अंतर्दृष्टी देण्यात आली; तो निष्क्रिय नसलेला प्रेक्षक होता परंतु अतिपरिचित चळवळीत सक्रिय सहभागी होता. नारा मोरे, बोकारो स्टील सिटी, झारखंड येथे नबेंदु सेन यांची बिरसा मुंडा पुतळा बिरसा मुंडाचा नारा ब्रिटिश राज-अबू राज सेटर जन, महाराणी राज तुंडू जन ("राणीचा राज्य संपुष्टात येऊ द्या आणि आमचे राज्य स्थापन होऊ द्या") यांना धमकी देत आहे - आज उडीसा, बिहार, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशातील प्रदेशांमध्ये याद आहे.

ब्रिटिश औपनिवेशिक व्यवस्थेने आदिवासी कृषी व्यवस्थेस सामंतिक स्थितीत रूपांतरित केले. आदिवासींनी त्यांच्या मूळ तंत्रज्ञानामुळे अधिशेष निर्माण करू शकले नाही, म्हणून छोटानागपुरमधील प्रमुखांनी आदिवासींना शेतकरी स्थापन करण्यास व शेतकरी म्हणून नियुक्त करण्यासाठी आमंत्रित केले. यामुळे आदिवासींनी घेतलेल्या जमिनींचा विपर्यास झाला. थाकाडर्सची नवीन वर्ग अधिक दडपशाही प्रकाराची होती आणि त्यांची बहुतेक मालमत्ता बनविण्यास उत्सुक होती. १८५६ मध्ये जगिर ६०० वाजले आणि ते एका गावातून १५० गावांमध्ये गेले. परंतु १८७४ पर्यंत जुने मुंडा किंवा ओराणचे नेते यांचे अधिकार जवळपास जमीनदारांनी सादर केलेल्या शेतकऱ्यांकडून संपूर्णपणे रद्द करण्यात आले होते. काही गावांमध्ये त्यांनी त्यांचे मालकी हक्क गमावले आणि शेतमजूरांची स्थिती कमी केली.

कृषी विस्कळीत आणि संस्कृतीच्या बदलाच्या दोन आव्हानांना, बिरसा यांनी मुंडेसह त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विद्रोह आणि विद्रोहांच्या मालिकेतून प्रतिसाद दिला. मुंद्यांच्या जमिनीचा खरा मालक म्हणून, आणि मध्यस्थ आणि ब्रिटिशांना निर्वासित करण्याचा हक्क म्हणून आंदोलन करण्याची मागणी केली गेली. ३ फेब्रुवारी १९०० रोजी चक्रधरपूरच्या जामकोपई जंगलात त्यांना अटक करण्यात आली. उपायुक्त रांची यांनी दिलेल्या पत्रानुसार, १५ वेगवेगळ्या गुन्हेगारी प्रकरणांमध्ये ४६० आदिवासींना आरोपी बनवण्यात आले होते, त्यापैकी ६३ जणांना शिक्षा झाली होती. एकाला मृत्युदंड, ३९ जणांना जन्मठेपेची आणि २३ जणांना चौदा वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. ९ जून १९०० रोजी बिरसा मुंडा यांचा तुरुंगात खटल्यांदरम्यान मृत्यू झाला.

# वैदिक- बौद्ध संबंध




व्यंकटेश देवनपल्ली,
संपर्क ९५३५०२२११२

आधुनिक केसरी

**नुकतंच मी वेद उपनिषदांतील श्लोकांवर आधारित 'हृदय कमलम' ह्या तेलुगु ग्रंथाचा हिंदी अनुवाद करून हातावेगळं केलं आहे. त्यानंतर लगेचच डॉ. ल.का. मोहरीर ह्यांचे "वैदिक- बौद्ध संबंध" हे पुस्तक माझ्या वाचनात आले. वैदिक आणि बौद्ध ह्यांच्यातील सहसंबंधांची समन्वयाची सूत्रे शोधून वैदिक व बौद्धांतले मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक अंतर कमी करता येईल ह्या स्वच्छ उद्देशाने हा विषय निवडला आहे. या ग्रंथात एकूण दहा प्रकरणे आहेत. लेखकाने त्यासाठी ज्ञानाची संकल्पना, धर्म आणि धम्म, धम्माची बदलती स्वरूपे, वैदिक-बौद्धांच्या समान संकल्पना, ब्रह्मविद्या आणि मध्यममार्ग, चित्तशुद्धीची साधना, परखा आणि शून्य, जीवनदृष्टी असे विषय निर्धारित करून त्यावर अभ्यासपूर्ण असे विवेचन या पुस्तकात केलेले आहे.**

दहावे प्रकरण हे इंग्रजांची कूटनीती सांगणारे आहे. हे प्रकरण वैदिकांना व बौद्धांना इंग्रजांनी एकत्र कसे राहू दिले नाही, या संदर्भातले आहे. फूट पाडणे संस्कृतिहीन करणे, परंपरांपासून दूर नेणे, भारतीयांना भारतीयत्व कळू न देणे यासाठी इंग्रजांची बौद्धिक क्षेत्रातील रणनीती आणि त्यामुळे विचारक्षेत्र प्रदूषित कसे झाले ह्याविषयी प्रस्तुत प्रकरणात विस्ताराने चर्चा केली आहे. या पुस्तकाला भिक्खु संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. भदंत राहुल बोधी यांची प्रदीर्घ आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभलेली आहे. ते लिहितात की, "धर्म वेगवेगळेच राहतील तरीदेखील आपण मानवी कल्याणाच्या दृष्टीने, धर्मा-धर्मांतील सलोखा आणि परस्पर बंधुभावाच्या नावाखाली समाज आणि राष्ट्राच्या कल्याणासाठी संघटित होऊन आपण आपल्या भारतमातेचे मस्तक उंच ठेवू शकतो. एकमेकांच्या संस्कारांचा आणि संस्कृतीचा आदर करून एकमेकांना आध्यात्मिक बळ देऊन आपण देशात सुख-शांती सदैव वाढवू शकतो, स्थिर ठेवू शकतो. आपणा सर्वांना मंगल मैत्री भावनेने, सद्भावना आणि बंधुभावाने पुढे जायचे आहे. आपली राष्ट्रीय एकता टिकवायची आहे. संस्कृत भाषा, इतिहास व वैदिक वाङ्मयाचा गाढा अभ्यास असलेल्या प्रा. डॉ. ल. का. मोहरीर ह्यांनी

या पुस्तकात वैदिक व बौद्ध मतांचा तौलनिक अभ्यास मांडला आहे. त्यावर प्रा. डॉ. प्रभाकर मांडे यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना म्हणजे एक वस्तुपाठच आहे, इतकी सुंदर प्रस्तावना त्यांनी लिहिलेली आहे. स्वामी गोविंददेवगिरी ह्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांची ही प्रस्तावना म्हणजे उंची पैठणीला लावलेली मूल्यवान किनार होय! त्यांची विषयाची खोली आणि व्यापकता व ग्रंथाकडे बघण्याची अपेक्षित दृष्टि याची यथार्थ जाण निर्माण करणाऱ्या या व्यासंगपूर्ण प्रस्तावनेने ग्रंथाची उपयोगिता खूप वाढली आहे. स्वामी आचार्य गोविन्ददेव गिरि ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, तत्वज्ञान, नीतिनियम व आचार- विचार या सर्व बाबतीत वैदिक आणि बौद्ध परंपरा ह्यात वेगळेपण फार कमी व समानताच फार अधिक आहे हे लक्षात येणे व सर्वांच्या लक्षात आणून देणे हे राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाचे कार्य होय. संस्कृत व संस्कृति विषयी डॉ. मोहरीर यांचे अपार प्रेम, प्रचंड व्यासंग, शुद्ध राष्ट्रीय दृष्टि आणि कष्ट उपसण्याची सवय हे सगळे गुण पुस्तक वाचताना प्रकर्षाने जाणवत राहतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष श्री मोहन भागवत यांची ही प्रशस्ति पुस्तकाचे महत्व अधोरेखित करून जाते. ते म्हणतात, "गेल्या काही शतकांमध्ये आपल्या अंतर्निहित एकतेच्या सूत्राचा विसर पडल्याने; व त्याचा फायदा घेऊन आक्रमकांनी व संधीसाधू स्वकीयांनी स्वार्थापोटी या मतभेदांच्या दऱ्या आणखी रुंद व खोल करण्याचा दुरुद्योग चालविल्याने, एकाच सत्याकडे विभिन्न प्रकृतीच्या लोकांना घेऊन जाणारे हे संप्रदाय आपसातल्या भांडण-तंट्यांचे विषय बनलेले दिसतात. अशा काळात भारत वर्षातल्या चिंतन परंपरेच्या दोन मुख्यधारा; सनातन वैदिक चिंतन प्रवाह व तथागतांचा बौद्ध चिंतन प्रवाह, यांचे परिश्रमपूर्वक अध्ययन करून त्यातील बहुसंख्य साम्यस्थळे व काही मतभेद यातून एकाच हिंदू समाजाच्यापरम लक्षासंबंधीच्या किंवा शाश्वत सत्यासंबंधीच्या दोन प्रवाहाचे संबंध दाखवणारे पुस्तक डॉ. ल. का. मोहरीर यांनी लिहिले, ही सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेकरिता अत्यंत महत्त्वाची व पोषक कृती केलेली आहे. लेखकाच्या मते भारतीय संस्कृतीला जे अमरत्व प्राप्त झाले त्याच्या मुळाशी वैदिक आणि बौद्ध वाङ्मयाची भक्कम बैठक आहे. वैदिक-बौद्ध वाङ्मये हे भारती संस्कृतीचे आधार आहेत अशी श्रद्धा प्राचीनतम काळापासून जनमानसात कायम टिकलेली आहे. वैदिक आणि बौद्ध या दोन परंपरांमुळे भारतीय संस्कृती, भारतीय भाषा, भारतीय धर्म, भारतीय वाङ्मय, भारतीय कला निर्माण झाल्या व विकास पावल्या असा भारताचा इतिहास सांगतो. मानवी जीवनाचे सुंदर प्रतिबिंब या वाङ्मयांतून उमटले आहे. ही भारतीयांची विशेषता आहे. ऋग्वेदातील आ नो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ( ऋ. १/८९/१ ) सर्व बाजूंनी मंगल विचार आमच्याकडे येवोत आणि सब्बे सत्ता सुखी होन्तु, भवतु सब्ब मंगलम्; सगळ्यांचे अस्तित्व सुखाने आणि मांगल्याने ओतप्रोत असो असा हा दोन्ही वाङ्मयांतला भाव विश्वकल्याणाचा आहे. दुर्दैवाने आज डॉ. ल. का. मोहरीर हयात नाहीत. परंतु वैदिक आणि बौद्ध परंपरामधील त्यांचे हे अध्ययन समाजासमोर आल्याने दोन्ही धर्मातील दार्शनिक व नैतिक सीमारेषा पुसट करण्यास हा ग्रंथ या विषयातील अभ्यासकांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल यांत शंका नाही.




**पुस्तकाचे नावः वैदिक- बौद्ध संबंध**
**लेखक : डॉ. ल. का. मोहरीर**
**सार्थक प्रकाशन, पुणे**
**पृष्ठ संख्याः ३६० किंमत रू. ४००/-**

# शोभाताई घुंगरे यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**परभणी जिल्ह्यातील मांडाखळी येथील शोभाताई मुंजाजी घुंगरे यांचा जन्म २० फेब्रुवारी १९८० रोजी झाला. कथा, कविता, लघु नाटिका ,ललित लेख, समीक्षा लेख इ. स्वरूपाचे लेखन करणाऱ्या शोभाताईंचा "अस्तित्व"हा पहिलाच काव्यसंग्रह आहे. या काव्यसंग्रहात शोभाताईंनी आई -वडील, आजी- आजोबा, मामा -मामी, बहिण -भाऊ, मैत्रिणी अशा जिव्हाळ्याच्या नातेसंबंधांविषयी हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. प्रत्येक स्त्रीच्या जीवनात या नात्यांना अनन्यसाधारण असे महत्त्व असते. विवाहनंतर अधून- मधून जेंव्हा ती माहेरी येते. तेंव्हा तिच्या साऱ्या आठवणी जाग्या होतात. नवीन लग्न झाल्यानंतर पहिल्या पंचमीच्या सणासाठी आतुर झालेल्या सासुर- वाशिनीच्या मनातील भावना व्यक्त करताना"पंचमीच्या झुला" या कवितेत शोभाताईं म्हणतात,**

**पंचमीचा झुला मनात झुले,**
**माहेराची ओढ रूप माझे खुले**
**बाप वेशीपाशी उभा असेल,**
**माझी सोनूली कशी दिसेल ?**
**आनंदी पाऊस अंगणात डोले**



जेंव्हा पंचमीचा सण जवळ येतो, तेंव्हा सासुरवाशिनीला माहेरी जाण्याची ओढ लागते. व तिच्या मनात जणू काही आनंदाने पंचमीचा झुला झुलतो. लेक माहेरी येणार म्हणून तिचं रूप पाहण्यासाठी बाप पेशीपाशी येऊन थांबतो, लेकीला पाहण्याची त्याला आतुरता असते. व त्याच्या ह्या आनंदात जणू काही पाऊसही अंगणात डोलत येतो. असे वर्णन कवयित्री करतात. जशी लेकीला पाहण्याची आतुरता बापाला असते तशीच माय ही तेवढ्याच व्याकुळतेने तिची वाट पाहत असते. याविषयी कवयित्री म्हणतात,

**माय माझी पाहत असेल वाट**
**पंचपक्वानणाने सजवूनी ताट**
**ओढ मायेची मोरपीस फुले**

लेक येणार म्हणून आई तिच्यासाठी तिच्या आवडीचे अनेक पदार्थ तयार करून तिची वाट पाहते.अनेक दिवसांनी माहेरी आलेल्या लेकीला सारे काही परके भासते. तिच्याच घरात तिला पाहुणी असल्यासारखे वाटते. लग्नापूर्वी तिने घरात सारीच कामे केलेली असतात. पण आता मात्र तिला काम करू देत नाहीत." मांडाखळी "या माहेरचे वर्णन करताना कवयित्री म्हणतात,

**परभणी जिल्ह्यात, इंद्रायणी माळ गं**
**माळयाच्या आल्याड, मांडाखळी गाव गं**
**वाट बघते माझी, आईचे सासर गं**
**आईचे सासर ते, माझेच माहेर गं**

मांडाखळी हे गाव कवयित्रीचे माहेर आहे. या गावाजवळ इंद्रायणी देवीचा माळ आहे.आईचे सासर हे लेकीचे माहेर असते व ते जणू काही कवयित्रीची वाट बघत आहे असे त्यांना वाटते. माहेरातील जिव्हाळ्याच्या नात्यांमुळे तिथे मायेला पूर येतो. व दिवाळी ,पंचमी अशा सणांना कवयित्रीला आहेरही मिळतो.

ज्या आईमुळे माहेराची ओढ लागते त्या आईचे वर्णन करताना कवयित्री म्हणतात,

**काय सांगू गं जनाला ? माझ्या आईची गं माया**
**माझ्या सुखासाठी तिने, झिजवली तिची काया**
**आले कुठून हे बळं विचारले तिला बाई**
**बोले कळेल गं तुला, जेंव्हा होशील तू आई**

आई ही मायेचा सागर असते. आपल्या मुलांसाठी ती सारे जीवन चंदनासारखे झिजवते. आईची ही माया पाहून कवयित्री जेंव्हा तिला विचारतात , "तुझ्या अंगी हे बळ कुठून आले ?" तेंव्हा त्यांची आई उत्तर देते की , "तू जेंव्हा आई होशील तेंव्हा तुला हे कळेल."पित्याची छाया दुरावल्यानंतर त्यांच्या आईने आई व वडील अशा दोन्ही भूमिका पार पाडल्या. व मुलांना लहानाचे मोठे केले. अशा या धाडसी आई विषयी कवयित्री म्हणतात,

**माय माझी गं धाडसी, कधी हरणार नाही**
**श्वास आहे जोवरी, मागे फिरणार नाही**

जीवनात कितीही संकट आले तरी आई आपल्या मुलांसाठी श्वासात श्वास असेपर्यंत जगत असते. आई विषयी पुढे कवयित्री म्हणतात,

**बाप गेला तरी आई धीर धरी**
**संसाराचा भार वाहे डोईवरी**

पित्याच्या मृत्यूचे दुःख अनेकदा कवयित्रींच्या शब्दा -शब्दातून व्यक्त होते. "बाप" या कवितेत कवयित्री म्हणतात,

**पाय चाले भराभरा, माय फिरे गरागरा**
**असे त्यांची ही कहाणी, पण असे ज्या घरा**
**गाय चाटते वासरा, माय आखडी कासरा**
**संसाराची ओढातानं, नसे बापाचा आसरा**

आई-वडिलांबरोबरच आजी -आजोबा ही आपल्या नातवंडांना तेवढीच माया लावतात. त्यांचे वर्णन करताना कवयित्री म्हणतात,

**सारे आपापल्या जातात कामावरती**
**आजोबा -आजी आमचा सांभाळ करती**

कवयित्रीला मामा-मामींचेही खूप प्रेम लाभलेले दिसते. आजोळा विषयी वर्णन करताना त्या म्हणतात,

**मामाच्या या घरात माझ्या,**



**माहेराची मज छाया दिसते**
**मामीच्या या हातात माझ्या**
**आईची माया दिसते**

बहिण -भावांचीही वर्णन कवयित्रीने केले आहे. प्रत्येक घरात भावंडांमध्ये छोट्या छोट्या कारणांवरून भांडण होतात. रुसा- फुगी चालू असते, कवयित्रीचेही भावासोबत असेच भांडण व्हायचे, व एखादे चॉकलेट मिळाले की त्या भावाची तक्रार आई-बाबांना सांगायच्या नाही व भावाचा मार चुकत असे. रक्षाबंधनाला भावाच्या भेटीसाठी माहेरी जाण्याची ओढ कवयित्रीला लागते. त्या म्हणतात,

**कधी माहेरी जाईल गं**
**त्याच्यासोबत राहील गं**
**भेटीच्या त्या श्रावणात मी**
**आनंदाने राहील गं**

दिवाळीचा सण आणि माहेरपण याचे एक अतूट असं नातं आहे. त्यामुळेच प्रत्येक सासुरवाशींना दिवाळीच्या सणासाठी माहेरी जावसं वाटतं. याविषयी वर्णन करताना कवयित्री म्हणतात,

**बाप न्यायला गं जाई**
**येई पहिली दिवाळी**
**लाडा-कौतिकाची लेक**
**माय दारात ओवाळी**
**हट्टाची लेक बाई**
**झाली कशी समजदार**
**नको बाबा ही हो साडी**
**आहे महाग ही फार**

दिवाळीच्या सणासाठी आलेली लेक बालपणी सारखा हट्ट करत नाही. ती आता एवढी समजदार कशी झाली ?याचे कौतुक आई-वडिलांना वाटते कारण आई-बाबांच्या परिस्थितीची त्यांच्या कष्टाची जाणीव तिला असते म्हणून ती जास्त महागाची साडी घेण्यास नकार देते.

पाच दिवसांची दिवाळी संपवून जेंव्हा लेक सासरी जाते माय बापाला घर सुने -सुने वाटते .लेक आल्यामुळे घर भरून वाटत होते. याविषयीचे वर्णन कवयित्री पुढील शब्दात करतात.

**घर लागे सुने-सुने**
**लेक परक्याचे धन**
**गेली चिमणी उडून**
**भरुनिया आले मन**

तिला वाटं लावून बाप जेंव्हा घरी परत येतो, तेंव्हा आई बाहेर ओसरीशी बसलेली असते. तिला घरात पाऊल ठेवावासा वाटत नाही.तिचे मन लेकीच्या आठवणीने भरून येते. दिवाळीच्या या सणाविषयी शेवटी कवयित्री म्हणतात,

**असा असतो गं बाई**
**सण दिवाळी वेगळा**
**माहेराला लेक येई**
**शीणं जाई गं सगळा**

आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे आई-वडिलांना सदैव कष्टच करावे लागतात. व लेक येणार म्हणून तिची बोळवण करण्यासाठी ते पैशाची तजवीज ही करून ठेवतात. अशी लाडाची लेक जेंव्हा दिवाळीसाठी माहेरी येते तेंव्हा त्यांचा सारा शीण हलका होतो असे कवयित्रीला वाटते.

अशाप्रकारे कवयित्री शोभाताई घुंगरे यांनी आपल्या अनेक कवितांमधून माहेराचे ,आई-वडिलांच्या मायेचे अत्यंत हृदयस्पर्शी असे वर्णन केलेले दिसते. प्रत्येक स्त्रीला आपली , जिव्हाळ्याची वाटावी अशी ही कविता आहे. स्त्री मनाच्या अनेक भावभावनांचे पदर कवियत्रीने या कवितांमधून उलगडलेले दिसतात. त्यांच्या या कविता निश्चितच माय मराठीला समृद्ध करणाऱ्या आहेत.

# पास-नापासवर गुणवत्ता ठरत नाही

आधुनिक केसरी

परीक्षेतील गुणांकन हे एक विशिष्ट



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

कालावधीत होणार मुल्यमापन असतं. विशिष्ट कालावधीतील मुल्यमापन हे आयुष्यभरासाठी लागु ठरवणं उचित नाही. गुणवत्ता ही दहावी बारावीच्या परीक्षेत अथवा अनुषंगिक परिक्षेत नापास झाल्याने अथवा अपयश आल्याने निश्चित होत नाही. गुणवत्ता ठरविण्याचे आपले निकष बदलले पाहिजे. आपण एका परीक्षेतील उत्तीर्ण अनुत्तीर्ण यावरून कोणाचीही गुणवत्ता निश्चित करू शकत नाहीत. मुळात शिक्षण हे माध्यम आहे जीवनाला दिशा देण्यासाठीच पण आपण धिर धरत नाहीत. थोडा निकाल मागे पुढे झाला कि लगेच मुल्यमापन ठरवुन ताण तणाव अथवा वेगळा काही मार्ग चोळाखतो हे एकदम चुकीचे आहे. नापास होण म्हणजे गुणवत्ता संपली असा शिक्कामोर्तब होणे नाही. एका टप्प्यावर एका वळणावर प्रवासाच मुल्य ठरवता येत नाही. आयुष्यच मुल्यमापन हे कोणत्याही एक विशिष्ट परस्थिती मध्ये घडलेल्या घटनेनुसार ठरत नाही.निरंतरता आणि अथक परिश्रम असतील तर अशक्य प्राय असं आयुष्यात काहिच नसतं .पण आपण धिर धरत नाहीत माणसांनी आयुष्यात प्रचंड असं धिरोदत्त असलं पाहिजे. आपला जन्म झाला आहे म्हणजे तो सहज झालेला नाही. आपण आयुष्यात निश्चित काही ना काही असं कारणार आहेत कि जग अचंभित होईल पण एखाद्या टप्प्यावर त्याच मुल्य ठरता कामा नये. आपल्याकडं रूढ सामाजिक मानसिकते नुसार कोणत्याही बाबींवर विषयावर तात्काळ शिक्कामोर्तब करण्याची पद्धत रूढ आहे.एखादा मुलगा समजा दहावी बारावी मध्ये नापास झाला तर तो त्याच क्षेत्रात अथवा इतर क्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्व होऊ शकतो. पण तो नापास झाला कि त्याच भविष्य संपले, असा आपण शिक्कामोर्तब करतो ही पद्धत उचित ठरणारी नाही नापास झाल म्हणजे खुप काही वाईट झाले असे नसते, कमी गुण मिळाले अथवा निकाल अपेक्षित आला नाही याचा अर्थ आपल्या मध्ये गुणवत्ता विद्वत्ता बुद्धिमत्ता नाही असे होते नाही.आयुष्यातील गुणवत्ता हि कोणत्याही वर्गात शिकत असताना प्राप्त गुण संख्येनुसार पास अथवा नापास झाल्याने निश्चित होत नाही. कोणत्या वर्गात किती मार्क पडले आपण पास झालो कि नापास झालो यावर आपली गुणवत्ता ठरत नाही सिद्ध होत नाही. निरंतर प्रयत्न हे आपल्याला योग्य ठिकाणी पोहोचवल्या शिवाय राहत नाहीत म्हणून निरंतर प्रयत्न करा. नापास झाले म्हणून खचुन जाऊ नका. पाहिला आल्याने अथवा नापास झाल्याने आपली गुणवत्ता ठरत नाही. प्रत्येक व्यक्ती मध्ये एक वेगळ गुण वैशिष्ट्य निसर्गाने ठासून भरलेले आहे. ते प्रकट होण्यासाठी एक विशिष्ट परिस्थिती योग्य वेळ येण अपेक्षित असते. म्हणून आपण कोणाचाही मुल्यमापन दहावी बारावी उत्तीर्ण अनुत्तीर्ण अथवा प्रथम द्वितीय आल्यावरून निश्चित करू शकत नाहीत ठरवू शकत नाहीत यशाची व्याख्या व्यक्तिपरत्वे वेगवेगळी असते. जसा वाव संधी मिळेल तसा तो कलागुण विराट रूप धारण करतो. आणि त्या क्षेत्रातील दिग्गज घडवतो. मुलं जेव्हा विद्यार्थी दशेत असतात तेव्हा त्यांना पालक म्हणून आपण अष्टपैलू होण्यासाठी वाव दिला पाहिजे.

# सत्य जरी कठोर असेल तरी. ..?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**सत्य जरी कठोर असेल तरी शेवटी तो सत्यच असतो कितीही त्याला हरविण्याचा प्रयत्न केले तरी तो कधीही हरत नसतो. म्हणून म्हणतात ना कीं, शेवटी सत्याचाच विजय होत असतो व नेहमी असत्याची हार होत असते या विषयी सर्वांनाच चांगल्याप्रकारे माहीतच असेल.**

थोडक्यात विचार करायला गेले तर आज जो जिकडे, तिकडे विशाल असा आकाश पसरलेला दिसत आहे आणि त्याच आकाशात असा एक लखलखता सूर्य दररोज निघताना दिसत आहे व आपल्या तेजाने दऱ्याखोऱ्यात घनदाट जंगलात तसेच इतर ठिकाणी सारखाच प्रकाश देत आहे पण अचानक एखाद्या वेळी, काही क्षणासाठी त्याच्या सभोवती असे मोठे, मोठे काळे कुट्ट ढग जमा झाले किंवा त्याला ग्रहण लागले तरी तो,सूर्य कधी कायमस्वरूपी लपलेला दिसून येते का. ..? मग या विषयी आपणच विचार करून बघायला पाहिजे. दिसणारा तो सूर्य सत्य आहे त्याच्या प्रकाशाशिवाय बरेच कामे अडून जातात जर एकदा का तो, स्पष्ट दिसला नाही की, सर्वजण त्याची आठवण काढत असतात हे, खरे आहे मग असत्याची का बरं कोणी आठवण काढत नाही. ..? हा एक मोठा भारी प्रश्न आहे. भलाही सत्य जरी कठोर असेल तरी तो कधीही हरत नाही व त्याचा ज्यांनी स्वीकार केला असेल त्यालाही तो हरू देत नाही. एखाद्या वेळेस काही अडचणी मुळे, प्रसंगामुळे क्षणभरासाठी हरत असेल पण,भलत्याच मार्गाने जात नाही.

कारण सत्य हा स्वयम् सर्वगुणसंपन्न असतो म्हणून आपणही त्याचे महत्व व महानता जाणून त्याची साथ धरून आपल्या जीवनाचा उद्धार करायला पाहिजे भलाही आपल्या जीवनात कितीही अडी, अडचणी संकटे, चांगले वाईट प्रसंग, परिस्थिती,



आपत्ती आली तरी कधीही सत्याची साथ सोडू नये व व्यर्थ गोष्टींच्या मागे लागून असत्याला आपलेसे करून घेऊ नये. माणसाचं जीवन म्हटलं तर.. नुसते सुखच असते असे अजिबात नाही त्यासोबत अनेक गोष्टी जुळून आलेल्या असतात, वेळ आली तर..पदोपदी काटे,ककंर वाटेत पडले असतात त्यांनाही पार करून आपल्याला सामोर जायचे आहे पण, सोबतीला मात्र सत्य धरूनच जो पर्यंत कोणतीही व्यक्ती सत्याला धरून राहते तोपर्यंत सत्य सुद्धा त्याची साथ सोडत नाही. म्हणून आपण फक्त एक दिवसाचा किंवा स्वतः पुरते विचार न करता होऊन गेलेल्या सर्व महाविभूतींच्या विषयी वेळात वेळ काढून विचार करायला पाहिजे कारण त्यांच्या जीवनात सुख नावाची गोष्टच नव्हती काहींच्या जीवनात सुख होते पण, तरीही त्यांनी स्वतः च्या बाबतीत कधीच विचार केले नाही सर्व सुखाचा त्याग करून समाजाच्या विकासासाठी देशाच्या भल्यासाठी व माणसाच्या कल्याणासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिले अनेक संकटाचा सामना केले पण, क्षणभरासाठी सुद्धा सत्याची साथ सोडले नाही.

म्हणून ते जगी अजरामर होऊन गेले कारण सत्य काय असते त्यांना माहीत होते. आपण सर्वजण त्यांच्या महान कार्याला वंदन करत असतो ,त्यांचे गुणगान करत असतो पण,त्यांनी दाखविलेल्या मार्गावर मात्र चालत नाही त्यांचे विचार आत्मसात करुन आचरणात आणत नाही म्हणून सत्य आपल्याला कळत नाही त्याची ताकद कळत नाही इथे कुठे तरी आपणच मागे आहोत या विषयावर सुद्धा विचार करायला पाहिजे. जोपर्यंत या आकाशात सूर्य, चंद्र, तारे आहेत तोपर्यंत होऊन गेलेल्या सर्व महाविभूती अजरामर राहणार आहेत सारा विश्व त्यांना वंदन करत राहणार आहे मग आपणच विचार करावे सत्यात किती मोठी ताकत असेल. ..? आपल्याला दिसून आले असेल म्हणून आपल्या जीवनाला आलेल्या प्रत्येक संकटाचा सामना करण्यासाठी तयार असले पाहिजे व कितीही संघर्ष करावा लागला तरी क्षणभरासाठी सुद्धा डगमगू जाऊ नये सदैव महाविभूतींचे विचार अंगिकारावे व सत्याचा स्वीकार करून या सुंदर अशा मानवी जीवनाला गती द्यावे. सत्य भलेही कठोर असेल तरी तो, शेवटी सत्यच असतो त्याला कोणीही जिंकू शकत नाही. म्हणून आपणही त्याची साथ धरून जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे नक्कीच एकदिवस जीवन जगण्याचा खरा अर्थ कळेल.

# अवयवदान



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**नरसापूर गाव या गावात महात्मा फुले विद्यालय असून त्यामध्ये इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे जवळ - जवळ सातशे ते साडेसातशेविद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेतले मुख्याध्यापक मानेसर हे निष्णातशिक्षक ते नरसापूर गावातच राहतात. नरसापूरच्या प्रत्येक नागरिकांमध्येमाने गुरुजींचा आदरयुक्त मान होता. त्याचे कारणही तसेच आहे. मानेगुरुजींचा नरसापूर गावातील महात्मा फुले विद्यालयाच्या उभारणीतमोलाचा वाटा असून अगदी विद्यालयाची जागा घेण्यापासून ते वर्गखोल्यांच्या बांधकामापर्यंत माने गुरुजी दिवसरात्र राबलेत. नरसापूरगावात कोणतेही कार्ये असो, त्यामध्ये प्रत्येक गावकरी माने सरांचासल्ला घेतल्याशिवाय ते कार्य करीत नसे. मग तो गावचा सरपंचअसो किंवा पोलीस पाटील अथवा गावातील अनुभवी वयोवृद्ध मंडळीअसोत, माने गुरुजी नरसापूर गावात मागील तीन दशकांपासून राहतात. माने सरला प्रत्येक धर्मांचे, जातींचे, पंथाचे लोक मनापासून गावातलाप्रमुख मानायचे आणि मानेसरांचा स्वभाव अगदी मनमिळाऊ मितभाषी व जिव्हाळ्याचा होता.**

ते कोणत्याही समाजाच्या लग्नकार्य, मिंककार्य, सामाजिक कार्यात बऱ्या वाईट प्रसंगांत व घटनांमध्ये सामीलहोत असे. म्हणून नरसापूरच्या प्रत्येक नागरिकात माने सरांविषयीआदरयुक्त भावना होती. शाळेतही आपल्या शिक्षकवृंदांशी नेहमी ते प्रेमाने व आपुलकीने वागणारे मुख्याध्यापक म्हणून अशी त्यांची ख्याती होती. त्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक मंडळी स्वतःला झोकून देऊन अध्यापनाचे व इतर शलेय कार्य मनापासून करायाचे. परिणामी महात्मा फुले विद्यालय हेता लुक्यातच नव्हे तर अवघ्या पंचक्रोशीत व संपूर्ण जिल्ह्यातशि क्षणासाठी प्रसिद्ध होते. याशिवाय मानेसरांनी गावाच्या बाबतीतही सकारात्मक विकासाची भूमिका राबवून गावात जनजागृती करून सरकारचे, उपक्रमांविषयी गावात एकतेचे महत्त्व स्वच्छतेचे महत्त्वगावकऱ्यांना समजावून सांगून दोनदा, महात्मा गांधी तंटामुक्तीचापु रस्कार व 'स्वच्छ भारत' उपक्रमाअंतर्गत स्वच्छता अभियान हे नरसापूर गावात राबविले. नरसापूर गावात मुस्लिम समाजाची दहा – बारा घरे होती.त्यातील काही मध्यम वर्गाची तर काही मोल मजुरीची कामे करणारी कुटुंबे राहत होती आणि त्यामध्ये सत्तारभाई आणि त्यांची पत्नी सलीमाबाई ही पण राहत. असे त्यांना लवकर मुलबाळ झालेले नव्हते. लग्नानंतर दहा - बारा वर्षांनी सत्तारभाईला एक मुलगा झाला.'करीम' असे त्याचे नामकरण करण्यात आले. करीम हा एकुलता एक मुलगा पण प्रकृतीने अगदी सडपातळ होता. तो सहा वर्षांचा झाल्यावर शाळेत जाऊ लागला. पुढे चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने महात्मा फुले विद्यालय पाचवीत प्रवेश घेतला.

दररोज शाळेत जाणे, अभ्यास करणे आणि फावल्या वेळेत आईवडिलांना घरकामांत मदत करणे. तसे सत्तारभाई स्वभावाने चांगले होते. गावात साऱ्यांशी मिळून - मिसळून वागणारे, कोणतेही काम करण्याची वृत्ती, गावात मिळेल ते काम करून आपल्या कुटुंबाचा प्रपंच चालवीत असे. सत्तारभाई आणि माने सरांची चांगलीच रास जुळलेली होती. त्यामुळे त्या दोघात नेहमी भेटीगाठी होऊन त्यांच्यात मुक्त संवाद होत असे. सत्तारभाई माने सरांना अलीकडे दररोज शाळेत येऊन भेटाययचे. करीमच्या अभ्यासाची विचारपूस करायचे. सर्व शिक्षकांना करीमकडे लक्ष देण्याची आदरपूर्वक विनंती करीत असत. शिक्षक मंडळीही सत्तारभाईला एक जागरूक पालक या नात्याने मान देत असत. करीम आता आठवीच्या वर्गात शिकत होता. आपले आईवडील गरीब आहेत. ते आपल्या प्रत्येक मागण्या पूर्ण करू शकत नाहीत. करीम शाळा सुटल्यावर व शाळा भरण्याअगोदर शिक्षकांच्या घरी पाणी भरणे - किराणा सामान आणून देणे. अर्थातच शिक्षकांनी सांगितलेली कामे करायचा. त्याचबरोबर आपला अभ्यासही तो नियमितपणे पूर्ण करीत असे. त्यामुळे करीम हा शाळेतील सर्व शिक्षकांच्या गळ्यातला ताईत बनला होता. करीमचा अभ्यासात - खेळात व इतर स्पर्धेमध्ये नेहमी प्रथम क्रमांक येत असे. परंतु करीमची प्रकृती ही सडपातळ असल्याने करीमला वारंवार उलट्या होणे, चक्कर येणे, अन्न अपचन होणे, हे त्याचे नेहमीच त्रास होऊन बसले होते. बरे त्याला तालुक्याच्या तज्ज्ञ डॉक्टराला दाखवावे तर घरात 'आठरा विश्वे दारिद्र्य आई सलीमाबाई गावातील

पाटील, देशमुख, इनामदारांच्या मळ्यात - शेतात मोलमजुरीची कामे करीत. त्यामुळे कसे तरी त्यांचा उदरनिर्वाह चाले. त्यामुळे घरात पैसेही शिल्लक राहत नसत. करीमच्या आजारपणाची गोष्ट मुख्याध्यापक माने सरांच्या कानावर गेली. कारण माने सरांना मूलबाळ नव्हते. म्हणून ते मनापासून करीमलाच आपला मुलगा मानीत होते. आणि त्यातच ते आनंदी होत असत. जसजसे करीमचे वय वाढत होते तसतसे त्याचा आजाराचा त्रास सुद्धा वाढतच होता. एके दिवशी शाळेतील सर्व शिक्षकांनी स्वतःहून पैसे जमा करून करीमला जिल्ह्याच्या तज्ज्ञ व नामांकित डॉक्टरांच्याद वाखान्यात नेण्याचा विचार केला. त्याच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. तपासणीचा अहवाल प्राप्त झाला. त्यात करीमच्या दोन्हीही किडन्या निकामी झालेल्या निघाल्या. ही वार्ता ऐकून सत्तारभाई तोंड झोडून - झोडून रडू लागले. सलीमाबाई तर गळा काढून फार रडल्यामुळे त्यांची शुद्ध हरपली. सारा गाव दुःखात बुडून हळहळ व्यक्त करू लागला. माने गुरुजीसह साऱ्या शिक्षकांचे डोळे पाणावले. आता सत्तारभाईवर संपूर्ण दुःखाचा डोंगर कोसळला होता. करीमचा दवाखान्याचा खर्च हा सत्तारभाईच्या आवाक्याबाहेरचा होता. एकुलताएक मुलगा त्यातही त्याच्या दोन्ही किडन्या निकामी. आता माझ्यामुलाचे



काय होईल ? ही चिंता त्यांना वाटत होती. माने गुरुजी दवाखान्यात हजर झाले. करीमच्या औषधउ पचारांचा खर्च शिक्षक मंडळी व काही गावकरी करू लागली. पणकरीमला बरे होण्यासाठी जवळपास चार ते पाच लाख रुपये खर्चयेईल. आणि महत्त्वाचे म्हणजे कोणी किडनीदाताही भेटला पाहिजे.ह्या साऱ्या गोष्टी करीमला मिळाल्या तरच करीम जिवंत राहू शकेल.अन्यथा देवाची मर्जी. या चिंतेपायी सत्तारभाई रोज दवाखान्यात नरसापूरहुन ये-जा करीत. माने गुरुजींनी करीमच्या बाबतीत घडलेली सारीहकीकतपाणावलेल्या डोळ्यांनी आपल्या पत्नीला सांगितली. या घटनेबद्दल माने पती-पत्नींच्या भावना अनावर झाल्या व ते दोघेही धाय मोकलून रडू लागले. योगायोगाने पुढच्याच महिन्यात माने गुरुजी हे मुख्याध्यापक ।। पदावरून सेवानिवृत्त होणार होते. आपल्याला पुत्र नाही म्हणून मनोमनी । माने सर करीमला आपलाच पुत्र मानीत होते आणि करीमच्या आई वडिलांची किडनी व रक्तगट हे करीमच्या किडनीशी व रक्त गटाशी जुळत नव्हते. म्हणून शेवटी माने सर व त्यांची पत्नी यांनी असे ठरविले की, आपल्या दोघांची एक - एक किडनी करीमला देऊ, परंतु चिंता ही होती की, माने सर आणि मानेबाई आणि करीम यांच्या किडन्या जुळल्या पाहिजेत व तिघांचे रक्तगट एकच असले पाहिजेत दुसऱ्या दिवशी मानेसर व त्यांत्या पत्नीने अवयवदानाचे अर्ज भरले.

त्यात डॉक्टरांचा सल्ला घेण्यात आला. डॉक्टरांनी माने सरांना सांगितले की, "तुमच्या तिघांचा रक्तगट सारखाच असावा व तुमच्या किडन्या करीमच्या किडनीशी जुळली गेली पाहिजे. तरच आपल्याला पुढच्या शस्त्रक्रियेची तयारी करता येईल. "देव तारी त्याला कोण मारी" या म्हणीची इथे प्रचिती आली. आश्चर्य म्हणजे माने सर व मानेबाई यांचा रक्तगट व किडन्या करीमच्या रक्तगटाशी व किडनीशी अगदी बरोबर जुळली. दवाखान्यात साऱ्यांना आनंद झाला. आता करीमला नवीन किडनी शस्त्रक्रिया करून बसवणार होते. त्यात करीमला उलट्या होणे, वारंवार चक्कर येणे हे बंद होणार होते. आणि खाल्लेले अन्नपचनी पडणार होते. मग ठरल्याप्रमाणे माने सर व त्यांच्या पत्नीने सर्व रीतसर बाबींनी दवाखान्यातील फॉर्म भरून डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे तीन - चार दिवसांनी माने सर व त्यांच्या पत्नींची शस्त्रक्रिया करून एक - एक किडनी काढून करीमला शस्त्रक्रियेद्वारे ती किडनी बसवण्यात आली. काही दिवसांनी करीमची दवाखान्यातून सुटी झाल्यावर त्याला हलके - हलके वाटून उलटी येणे, चक्कर येणे हे बंद झाले. त्याला आता चांगल्या प्रकारे अन्न पचन होऊन सहज चालता - बोलता, उठता बसता येत होते. करीमला जगण्याची एक नवी संजीवनी मिळालेली होती. नरसापूर गावातील मुख्याध्यापक माने सरांनी व त्यांच्या पत्नीने करीमला किडनीदान करून अवयव दान जागृतीचा एक नवा अध्याय लिहिला आहे. करीमकडे पाहताना या पती - पत्नीला आपण अवयवदान केल्याचे मनोमनी समाधान व आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

# धर्मांध सत्तेच्या राजकारणामुळे पुन्हा जातीयवाद बोकाळला दलितांवरील अन्याय, अत्याचार, खून, आत्महत्या वाढल्या...

## ॥ मंथनाचे पैलू ॥






डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २०

भारत देशातील सत्ताधाऱ्यांच्या वाढत्या धर्मांधतेमुळे सध्या जाती-जातीत, धर्मा-धर्मात तेढ निर्माण होऊन एकूणच समाजात भीतीचे व कलहाचे वातावरण निर्माण झाले आहे. धर्मांध सत्तेच्या राजकारणामुळे पुन्हा धर्मांधता व जातीयवाद, बोकाळला असून मागासवर्गीयांवर, दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या घटना पुन्हा वाढल्या आहेत. या घटना दिवसेंदिवस वाढतच आहेत. याला सर्वस्वी जबाबदार इथले विद्यमान धर्मांध सत्ताकारण आहे,असे म्हणणे चुकीचे होणार नाही; कारण भारत देश म्हणजे लोकशाही राष्ट्र आहे, हे जगाला माहित आहे आणि या धर्मनिरपेक्षवादी लोकशाही राष्ट्रात कट्टर धर्मांधतेचा पुनर्जन्म का होत आहे ? ह्या कट्टर धर्मांधतेला कोण पुनर्जीवित करत आहे ? म्हणजे या देशातली लोकशाही संपलेली आहे का ? नसेल संपली तर धर्मांधतेचा कहर थांबला पाहिजे. तो थांबवण्याचा अधिकार जनतेलाही आहे. यासाठी जनता रस्त्यावरही उतरू शकते. विविध समाजातील थोर महापुरुषांचे अपमान व बदनामी करणाऱ्या घटना वाढल्या आहेत. महापुरुषांचे स्मृतीदिन किंवा जयंतीच्या सोहळयाचे आयोजन करणे अवघड होऊन बसले आहे. ग्रामीण भागात आता जातीयवाद नव्याने डोके वर काढू लागला आहे. दलित, मागासवर्गीयांवरील अन्याय अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. जातीयवाद्यांकडून नुकतेच दोन दलित तरुणाचे खून झाले आहेत. नांदेड जिल्ह्यातील बोंढार हवेली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केली म्हणून गावगुंडांनी अक्षय भालेराव या दलित तरुणाचा भरदिवसा भोसकून खून केला.

दुसरी घटना म्हणजे रेणापूर येथील गरीब मातंग समाजाच्या माणसाची अनाधिकृत सावकारीच्या पैशातून भरदिवसा हत्या करण्यात आली. तिसरे प्रकरण म्हणजे शशिकांत चंद्रकांत बोतलाजी याने कार्यकर्त्यांच्या छळाला त्रासून आत्महत्या केली. ह्या घटना ताज्या आहेत. संताची भूमी असलेल्या महाराष्ट्राला लाजविणाऱ्या आहेत.

हे सरकार दलितांवर होणाऱ्या अत्याचारावर काहीच बोलत नसेल तर हे सरकार सावकार व भांडवलदारांच्या बाजूने आहे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. राज्य सरकार दलितांचा, मागासवर्गीयांचा, वंचितांचा कैवार घेणार नसेल तर. दिवसेंदिवस अशा घटना वाढत जातील. राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडेल, यालाही जबाबदार राज्य सरकार असेल. सरकारने वाढवलेला धर्म असेल, सरकारची धर्मव्यवस्था असेल; कारण मनुवादी धर्मव्यवस्थेनुसार वर्णव्यवस्थेत दलित अतिशुद्र आहे. त्याची कशाला काळजी घेणार. ? त्याचा फक्त मतदान करण्यासाठी व इतरांची कामे करण्यासाठी जन्म झालेला आहे. आता केवळ दलितांनाच नव्हे; तर भारतीय समाजाला असुरक्षित वाटू लागले आहे. याला जबाबदार इथली न्यायव्यवस्था व गृहखाते आहे. गेल्या सात आठ-वर्षात कोणताही समाज सुरक्षित राहिलेला नाही. कोरोनानंतर हिंदू- मुस्लिम वाद वाढले, दंगे वाढले. खून खटले, जाळपोळ, मारामाऱ्या, आत्महत्या, दलितांवरचे अन्याय-अत्याचार पुन्हा वाढले. याचे कारण काय आहे.. तर केंद्रातल्या सत्ताधाऱ्यांनी धर्मांधतेचा प्रचार-प्रसार केला. बुवा, बाबांना अभय दिले, मंदिरे, देवळांचे राजकारण केले. यामुळे भारतात पुन्हा कर्मठ आणि कट्टर धर्मवादाचा पुनर्जन्म झाला. कर्मठ आणि




कट्टर धर्मवादाचा जन्म झाला की, तिथे कट्टर जातीयवादाचा जन्म होतो. जातीयवादाचा जन्म झाला की, तिथे कट्टर वर्णवादाचा जन्म होतो. वर्णवादाच्या पोटीच कट्टर भेदभावाचा जन्म होतो, भेदभावाच्या पोटी ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र,अतिशुद्र असे जातीय वर्गीकरण सुरु होते. या जातीय वर्गीकरणातून पुन्हा जातीय अहंकाराचा जन्म होतो. जातीय अहंकारातून इतरांबद्दल तुच्छतादर्शक भावना निर्माण होते या भावनेतून माणूसच माणसाचा द्वेष करू लागतो.. यातूनच सामाजिक कलहाची निर्मिती होते. म्हणून कर्मठ आणि कट्टर धर्मांधता हे सामाजिक कलहाचे मूळ आहे आणि अशी धर्मांधता ह्या देशातील विद्यमान सरकारने आता वाढीस लावली आहे. तिला खतपाणी घातले आहे, खतपाणी घालणे चालू आहे. याचा प्रत्यय नवीन संसद भवनाच्या उद्घाटन सोहळ्यात आलेल्या बहुसंख्य बाबा बुवांची उपस्थिती होय ! भारताच्या विद्यमान सरकारने लोकशाहीच्या धर्मनिरपेक्षतावादी राष्ट्रात अशी कट्टर धर्मांधता वाढवू नये. अशा कट्टर धर्मांधतेमुळे राष्ट्रात एकता, अखंडता टिकून राहणार नाही. परिणामी राष्ट्राच्या एकसंधतेला धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून अशा कट्टरतावादी धर्मांधतेला वेळीच आवर घालणे राष्ट्रहिताचे आहे. भारतात असंख्य जातीचे व असंख्य धर्माचे लोक राहतात. ते आतापर्यंत एकदिलाने, गुण्या गोविंदाने नांदत होते. मात्र आता समाजात दुही निर्माण झाली आहे. सत्ताधाऱ्यांनो कोणत्याही एका जातीचे, एका धर्माचे हे राष्ट्र नाही. कोणत्याही एका पक्षाचे, एका संघटनेचे हे राष्ट्र नाही. इथला बहुजातीय व बहुधर्मीय समाज लोकशाहीच मानतो. लोकशाहीच्या धर्मनिरपेक्षवादी संहितेवरच या राष्ट्राची उभारणी झालेली आहे. म्हणून ही लोकशाहीआडून चाललेली हुकुमशाही जास्त काळ चालणार नाही. याचा निवडणूकीत नकारात्मक परिणाम दिसेल. निवडणूकीतल्या इव्हीएम यंत्रणेत अफरातफर वाटू लागली की, लोक मतदानावर बहिष्कारही टाकू शकतील म्हणून जनतेला चांगली वागणूक द्या! समाजा-समाजात भांडणे लावणे थांबवा.




सत्ताधाऱ्यांविरोधात बोलणाऱ्यांचा आवाज स्वायत संस्थाचा दुरूपयोग करून दाबला जातोय, जनतेचे मूलभूत हक्काचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. ही सत्ताधाऱ्यांची अघोषित आणीबाणी लवकर संपली पाहिजे. भारतीय समाज खूप सहनशील आहे, तितकाच तो उद्रेकी आहे. आज जाती-जातीत, धर्मा-धर्मात चालू असलेला कलह कोणामुळे आहे. दलितांवर अन्याय करणाऱ्या जातीयवादी शक्तींना कोणाचे अभय मिळत आहे. केंद्रीय गृहमंत्र्यांना, महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना दलितांचे खून होत असलेले दिसत नाहीत का ? पोलीस प्रशासन अन्याय करणाऱ्यांना, खून करणाऱ्यांना पाठीशी का घालत आहे ? खून करणाऱ्यांना जर पाठीशी घालणार असाल तर ते सोकतील आणि उद्या दलितांवरच नाही,तर इतर समाजातील निरपराध लोकांचेही खून व अत्याचार करायला ही गुंड मंडळी मागेपुढे पाहणार नाही. म्हणून महाराष्ट्र राज्य सरकारने विशेष म्हणजे गृहमंत्र्यांनी अशा गावांना भेटी देऊन तेथील गुंडांचा वेळीच बंदोबस्त करावा. गावगुंडांच्या बंदोबस्तासाठी प्रत्येक गावात पोलीस चौकी स्थापन करावी. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी गावागावात पोलीस चौकी असणे आवश्यक आहे. भारतीय निरपराध माणूस नोटबंदीमुळे, आभासी चलनामुळे व बेरोजगारीमुळे अगोदरच कंगाल झाला आहे आणि पुन्हा त्याला दंगे, खून खटले, मारामाऱ्या,आत्महत्या, आणि जातीयवाद नको आहे; परंतु त्याला ह्या घटनांचा सामना करण्याची वेळ येत असेल तर या घटनांची जबाबदारी कोणाच्या माथी मारणार ?

# कन्नड साखर कामगारांच्या 'घामाचा दाम' मिळवून द्या

## ॲड. कृष्णा पाटील जाधव : शहरात आयोजित करण्यात आला होता व्यापारी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड सहकारी साखर कारखान्याच्या निवृत्त कर्मचाऱ्यांचा थकीत पगार मा. मंत्रि महोदयांनी शासनामार्फत राज्य सहकारी बँकेकडून न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे मिळवून द्यावा, अशी मागणी ॲड. कृष्णा पाटील जाधव, संचालक कन्नड सहकारी साखर कारखाना यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, कन्नडचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या व्यापारी मेळाव्यात बोलताना केली. सदर मेळाव्याचे आयोजन हे केंद्रीय मंत्री भागवत जी कराड यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी बहुसंख्य व्यापारी व कन्नड सहकारी साखर कारखान्याचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. कृष्णा पाटील जाधव असे म्हणाले की .कन्नड सहकारी साखर कारखाना हा 2009 साली बंद पडला, त्यावेळी कारखान्याच्या कर्मचाऱ्यांची सुमारे 38 महिन्याचे 25 कोटी रुपये पगारापोटी व ग्रॅच्युटीपोटी कारखान्याकडे थकीत होते, दरम्यान महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सदरचा कारखाना थकीत कर्जापोटी जप्त केला व विक्री केला, त्यामुळे साखर कामगारांनी सदर रक्कम वसुली पोटी उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे राज्य सहकारी बँकेच्या विरुद्ध पगार मिळणे बाबत याचिका दाखल केली, माननीय उच्च न्यायालयाने सदर याचिकेत निर्णय देताना असे सुचविले की, बँकेने कारखाना विक्रीतून आलेली सुमारे 50 कोटी रक्कम ही नो लिन अकाउंट मध्ये जमा करावी व इतर कुठेही खर्च करू नये, त्यातूनच कामगारांची कायदेशीर देणी देण्यात यावी. तसेच कामगारांनी देखील आपला पगार सक्षम अधिकाऱ्यामार्फत सक्षम न्यायालयाकडून तपासून सादर करावा, अशा प्रकारचा निर्णय दिला. त्याप्रमाणे कामगारांनी आपला पगार सक्षम अधिकाऱ्यांमार्फत सक्षम न्यायालयात तथा कामगार न्यायालय तपासून राज्य शिखर बँकेकडे सादर केला, कामगार न्यायालयाचा निर्णय होऊनही राज्य शिखर बँकेने अद्याप पावेतो कामगारांना त्यांचा पगार अदा



केला नाही, वास्तविक माननीय उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध राज्य शिखर बँकेस सर्वोच्च न्यायालयात कोणताही स्थगिती आदेश मिळालेला नाही. तरीदेखील राज्य शिखर बँक ही कामगाराचा पगार देण्यास टाळाटाळ करीत आहे. त्यामुळे कामगारांनी राज्य शिखर बँके विरुद्ध अवमान याचिका देखील दाखल केलेली असून जी माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद, येथे प्रलंबित आहे, अशा परिस्थितीत मंत्रिमहोदयांनी मा. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे शिफारस करून त्यांच्या मार्फत राज्य सहकारी बँकेस आदेश करून कामगारांच्या थकीत पगार व ग्रॅज्युएटीची रक्कम त्यांना मिळवून द्यावी,.. अशी मागणी केली.

सदर मागणीस उत्तर देताना मा. भागवत जी कराड असे म्हणाले की, मी लवकरात लवकर माननीय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याशी संपर्क करून आपली थकीत पगाराची रक्कम राज्यसिंकर बँकेकडून मिळवून देतो. यावेळी मा. मंत्री महोदयांचा साखर कामगारांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला व त्यांना सदर मागणीचे निवेदन ही दिले. यावेळी ॲड. कृष्णा पाटील जाधव यांच्या समवेत साखर कारखान्याचे माजी संचालक उत्तमराव राठोड, कामगार सचिव लालमीयां शहा, कामगार प्रतिनिधी कृष्णा मोहिते,आर. व्ही. शिंदे, दत्तू मोहिते, अशोक राहीज, राजीव नलावडे, सुभाष जाधव, नामदेव जाधव, येडूबा जाधव, भाडाईत, चव्हाण, आहेर ई. कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# फोटोसेशन करणारे कृषीमंत्री, पालकमंत्री यांनी राजीनामा द्यावा : माजी आ. पवार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे अतिवृष्टी व गारपीटी मुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह पाऊसाने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरवुन घेतला आहे हरबरा मका गहु कांदा भाजीपाला यांच्या सह अन्य पिकाचे नुकसान झाले मात्र

आतापर्यंत शेतकऱ्यांना अतिवृष्टी नुकसान भरपाई नाही प्रोत्सानपर शेतक -यांना 50 हजार रुपयाची फसवी घोषना केली कांदयाला भाव नाही कापुस शेतकऱ्यांच्या घरात पडुन आहे मात्र कृषी मंत्री अब्दुल सत्तार तसेच पालक मंत्री संदिपान भुमरे यांनी शेतकरी व कांदया सोबत फोटो काढुन फक्त फोटो शेशन करून वेळ काढु पणा केला अश्या बेजबाबदार कृषी मंत्री अब्दुल सत्तार पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी शेतकरी यांची थट्टा केली शेतकरी यांना एक छदाम सुध्दा दिला नाही अश्या बेजाबदार मंत्री यांनी राजीनामा दयावा असे माजी आमदार नामदेवराव पवार यांनी कन्नड तहसील कार्यालयावर मोर्चा काढुन नायब तहसीलदार मोनाली सोनवणे यांना निवेदन देतांनी आक्रोश व्यक्त केला या वेळी .

प्रकाश बारगळ, भाऊसाहेब पवार, शेख याकूब, मोगल वाघ ,सुलतान भाई, संतोष चव्हाण ,आप्पासाहेब साबळे, जगन पवार, रमेश शिंगारे, शिवाजी पवार, बाबासाहेब मुरकुंडे, शंकर पवार, साहेबराव शिंगरे, सुचित्रा आवाळे, शकुंतला देहाडे शोभाबाई शिंगारे इत्यादींची उपस्थिती होती .

# हे बॅनर पाहून नागरिकांनी डोळे टिपले

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आजपर्यंत पाणी प्रश्नावर कित्येक आंदोलना पाहिले असतील परंतु सामाजिक कार्यकर्ते आनंद लोंढे व शंकर खरात यांनी चक्क बॅनर लावून आंदोलन करण्यात आले त्या बॅनर मध्ये असे लिहिले होते की एक दिवसाआड नियमित पाणी द्या नाहीतर राजीनामा द्या, बीजेपी क्या हुआ तेरा वादा, धुळेकर जनतेने पाण्यासाठी किती हाल सोसावे तुम्ही अनेक स्टोरी दाखवा आम्ही तुमची पाणी पाणी स्टोरी दाखवू असे या बॅनर मध्ये उल्लेख करण्यात आले होते परंतु बॅनर लावल्यानंतर अर्ध्या तासात पालिका प्रशासन पोलीस प्रशासन त्या ठिकाणी येऊन तात्काळ ते बॅनर ताब्यात घेतले त्या अर्ध्या तासात कित्येक धुळेकर जनतेने त्या बॅनरवर त्यांचे डोळे टिपले व काहींची चर्चा ही झाली असत्य लपवण्यासाठी अनेक स्टोरी दाखवतात पण महत्त्वाचा पाणीप्रश्न हा मुद्दा भटकवण्याचा प्रयत्न बीजेपी ने केला आहे असे या ठिकाणी नागरिकांनी सांगितले. बीजेपी वाल्यांनो पोलिस प्रशासनाने विनंती केली म्हणून आम्ही तात्पुरता हे बॅनर काढत अहोत असे सांगून बॅनर काढत सहकार्य केले.तूम्ही कितीदा बॅनर काढण्यासाठी.. तुमचे पाप लपवण्यासाठी प्रयत्न करणार... आज नाहीतर उद्या या प्रश्नांना तुम्हाला उत्तर द्यावेच लागेल असे आनंद लोंढे यांनी वक्तव्य केले आहे पुन्हा संपूर्ण शहरभर बॅनर लावणार असे या ठिकाणी आवाहन करण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टी पाणी स्टोरी केव्हा..? धुळे महानगरपालिका सत्ताधाऱ्यांनो एकदिवसा आड पाणी द्या.. नाहीतर राजीनामा द्या असे वक्तव्य ही करण्यात आले. बीजेपी क्या हुवा तेरा वादा....? ४ वर्षापूर्वी धुळेकर जनतेला खोटे आश्वासन देवून तुम्ही धुळे महानगरपालिका सत्ता घेतलीत.एकही वायदा पूर्ण केला नाही.बोला सत्ता उन्माद करणाऱ्यांनो केव्हा दाखवणार पाणी स्टोरी..? २० जून २०२३पर्यंत धुळेकर जनतेला एकदिवसा आड पाणी दिले नाही तर धुळे महानगरपालिका आणि तुमच्या घरांना खाली हंड्याचे तोरण बांधून तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही या ठिकाणी आंबेडकरी जनतेने केला आहे.




# वर्धापनदिन सोहळ्याने महावितरण कर्मचाऱ्यांना मिळाली नवी ऊर्जा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** कथाकथन, एकपात्री नाट्यप्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी खेळ अशा भरगच्च कार्यक्रमांनी मंगळवारी (6 जून) महावितरणचा 18 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या हस्ते केक कापून आनंद साजरा करण्यात आला. ग्राहकांना अविश्रांत सेवा देणाऱ्या महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना या सोहळ्यामुळे नवी ऊर्जा मिळाली.



औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात हा सोहळा रंगला. याप्रसंगी डॉ.गोंदावले म्हणाले की, गेल्या 18 वर्षात महावितरणने विविध पातळ्यांवर उत्तम प्रगती केली आहे. गतवर्षी कंपनीने 75 हजार कोटी रुपयांची वीजबिल वसुली केली आहे. याचे याचे श्रेय सर्व कर्मचाऱ्यांचे आहे. त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे महावितरणला वर्षभरात विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले. विद्युत अपघातांचे प्रमाण कमी केल्याबद्दल नुकताच पुरस्कार मिळाला आहे. मात्र एवढ्यावरच न थांबताअपघातमुक्त महावितरण हे ध्येय ठेवून कर्मचाऱ्यांनी विद्युत सुरक्षेस सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्य अभियंता डॉ.केळे म्हणाले की, विद्युत क्षेत्रातील बदलत्या धोरणामुळे खासगी कंपन्या येऊ घातल्या आहेत. त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी महावितरण कर्मचाऱ्यांना सक्षम व्हावे लागेल. कंपनीला 18 वर्ष पूर्ण झाली असून आता आपण प्रौढ झालो आहोत, त्यानुसार आपले वागणे आणखी जास्त जबाबदारीचे असणे जनतेला अपेक्षित आहे.

डॉ.केळे यांनी संत तुकारामांच्या अभंगातील दाखले देत विजेचा निःपक्षपातीपणा आणि विजेच्या बचतीचे बचतीचे महत्त्व पटवून दिले. यावेळी दीक्षा सोनवणे यांनी विविध खेळ व स्पर्धा घेऊन महिलांचा उत्साह वाढवला. प्रा. रवींद्र कोकरे यांच्या खुमासदार शैलीतील कथाकथनाने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. संदीप पाचंगे यांच्या ‘चुकीला माफी नाही’ या एकपात्री प्रयोगाने विद्युत सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. दिलीप खंडेराय व संचाने सादर केलेल्या ‘महाराष्ट्राची लोकधारा’ या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. ‘ज्युनिअर चार्ली’ सोमनाथ स्वभावणे यांनी बच्चे कंपनीचे मनोरंजन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता अविनाश सानप यांनी केले. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय यंत्र अभियांत्रिकी परिषदेसाठी निवड झाल्याबद्दल कर्मचारी नितीन सूर्यवंशी यांचा मुलगा स्वराज याचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.गोंदावले यांनी रोख 10 हजार रुपये देऊन कौतुक केले. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, मोहन काळोगे, उत्क्रांत धायगुडे, सतीश खाकसे, उपसंचालक सतीश कापडणी, सहायक महाव्यवस्थापक शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील, कार्यकारी अभियंता दीपक सोनोने, प्रेमसिंग राजपूत, महेश पाटील, भूषण पहूरकर यांच्यासह महावितरणचे अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा आनंद घेतला.

# धनवट येथे खरीप हंगाम पंधरवडा निमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज


**सोयगाव :** तालुका कृषि अधिकारी सोयगाव आर. जि. गुंडीले यांच्या मागदर्शना खाली खरिप हंगाम पधरवाडा निमित्त मौजे धनवट व वरखेडी खु येथे शेतकारी मागदर्शन सभा घेण्यात आली. या मध्ये एकात्मिक कापूस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी प्रकल्प याविषयी कृषि पर्यवेक्षक एस. आर.चौधरी यांनी मार्गदर्शन केले. तसेच माती नमुना कसा घेतात याविषयी कृषि सहाय्यक बी. आर. चौरे यांनी माहिती दिली. उताराला आडवी पेरणी करणे, पेरणी करताना खताचा बेसल डोस पेरून देणे, बियाणे खरेदी करताना घ्यावयाची काळजी या विषयी कृषि सहाय्यक आरती बावस्कर यांनी सविस्तर असे सखोल अशे मागदर्शन करण्यात आले. या वेळी गावातील सरपच, उपसरपंच, ग्रामपचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तलाठी कार्यालयातून रजिस्टर गहाळ; शेतकऱ्यांची शासकीय कामे रखडली

## जाफराबाद तलाठ्यांना कोणाचा आशीर्वाद : नीता गंगावणे

आधुनिक केसरी न्यूज



**जाफराबाद :** तालुक्यातील नांदखेडा गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मालकी हक्कात केलेल्या बदलाची नोंद असणारे तलाठी कार्यालयातील फेरफार रजिस्टर गहाळ झाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या रजिस्टरचा पत्ता लागत नसल्याने शेतकरी त्रस्त आहेत. गावातील अनेक शेतकऱ्यांनी शेतजमिनीच्या खरेदी-विक्रीसाठी तसेच अन्य शासकीय कामासाठी फेरफार नक्कलीसाठी तलाठी कार्यालयात अर्ज केला आहे. परंतु फेरफार नोंद रजिस्टरच गहाळ झाल्याने त्या मिळत नाहीत. या वरुन असे सिद्ध होत जाफराबाद तहशिलचे कर्मचारी जाणूनबुजून झोपेचे सोंग घेवून साखर झोपेत आहे आणि इकडे शेतकरी नांदखेड मधे तलाठी कार्यालयाचे लखलखत्या उन्हात उंबरठे झिजवत आहे.याबाबत नीता गंगावणे यांनी वेळोवेळी तलाठी यांना विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिली जातात यांना कोणाचे अभय आहे.म्हणून शेवटी नीता गंगावणे यांनी विभागीय आयुक्तांकडे लेखी तक्रार केली आहे.जाफराबाद तहसीलची स्थापना होऊन ४१ वर्षे झाली आहेत. तालुक्यात १०१ गावांचा समावेश आहे. या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीच्या व्यवहाराची तसेच सातबारावर केलेल्या नोंदीचे रेकॉर्ड तलाठी आणि नांदखेडा गावाला गेल्या नऊ वर्षात दोन-तीन तलाठी यांच्या बदल्या झाल्या आहेत. त्यांच्याकडून मला सदरील फेरफार रेकॉर्ड मिळाले नाही. याबाबत पोलिसात तक्रार केली असल्याची चर्चा आहे. मात्र, गुन्हा नोंद झाला की नाही हे माहीत नाही. गहाळ झालेल्या फेरफार नोंद रजिस्टरमध्ये किती शेतकयांच्या जमिनीचे फेर आहे. यांचासुद्धा अंदाज सांगता येत नाही.

तहसील कार्यालयात झालेले आहे. मात्र, नांदखेडा गावाचे फेरफार नोंद आहेत. रजिस्टर गेल्या अनेक वर्षांपासून गहाळ झाले आहे. त्याचा शोध अद्याप लागलेला नाही.मग तहशिलचे कर्मचारी करतात काय त्यांना कोणाचा धाक नाही का अशा प्रश्ननं येथील ग्रामस्थांना पडला आहे.या प्रकरणी तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार करूनही रजिस्टरचा शोध लागलेला नाही. नांदखेडा येथील नीता गंगावणे या महिलेने गट क्र. १६८ मधील जमिनीच्या खरेदी व्यवहाराची फेरफार नक्कल मिळण्यासाठी अर्ज केला आहे. परंतु त्यांना ती मिळत नसल्याने त्यांनी विभागीय आयुक्तांकडे तक्रार केली आहे. त्यांनी सुरुवातीला तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षातील श्रीकृष्णा फुलमाळी या कर्मचाऱ्याकडे अर्ज केला. त्यांनीही उडवाउडवीची उत्तरे देत फेरफार नोंद रजिस्टर गहाळ झाल्याचे सांगितले. तसेच त्यांना नोंद नसल्याचे लेखी पत्राद्वारे कळविले आहे. निता गंगावणे यांच्यासह गावातील अनेक शेतकऱ्यांची कामे फेरफार नक्कल मिळत नसल्याने रखडली

त्यामुळे या प्रकरणी विभागीय आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली. असून, तहसील प्रशासनाला आदेश देऊन फेरफार नक्कल देण्याची विनंती निता गंगावणे यांनी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# गडकरींच्या दाव्याला भाजपाकडूनच खो!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरात चोवीस बाय सात पाणीपुरवठा योजना सुरू झाल्यापासून पाण्यासाठी मोर्चे काढणे बंद झाले, असा दावा भाजपाचे नेते व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी करीत असले तरी प्रत्यक्षात चित्र मात्र वेगळे आहे. बुधवारी भाजपाच्या नेतृत्वात उत्तर नागपूरमधील पाणी समस्येच्या मुद्यावरून महापालिकेच्या आशीनगर झोनवर मोर्चा काढण्यात आला व निदर्शने करण्यात आली. महापालिकेने शहरातील पाणी वितरणाचे खासगीकरण करीत एका कंपनीकडे योजनेच्या संचालनाची जबाबदारी दिली. कंपनीने चोवीस तास पाणीपुरवठा करू, असा दावा केला होता. प्रायोगिक तत्त्वावर ती एका झोनमध्ये राबवण्यातही आली. दरम्यानच्या काळात भाजपाने या योजनेचा मोठा प्रचार केला. भाजपाचे ज्येष्ठ नेते गडकरी हे जाहीर कार्यक्रमात या योजनेचा उल्लेख करीत योजना लागू केल्यापासून नागपूरमध्ये पाण्यासाठी मोर्चे निघणे बंद झाले, असा दावा करीत होते. मात्र, त्यांचा हा दावा त्यांच्याच पक्षाकडून खोडून काढला जात आहे.

बुधवारी उत्तर नागपूरमधील पाणीटंचाईच्या संदर्भात भाजपाचे उत्तर नागपूरचे उपाध्यक्ष दिनेश इलमे यांच्या नेतृत्वात आशीनगर झोन कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. लष्करीबागमध्ये नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही, असा दावा त्यांनी केला आहे. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांनी निदर्शनेही केली व संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी उत्तर नागपूर भाजपाचे संपर्क मंत्री संजय तरारे, उपाध्यक्ष महेश माने, मनोज कहाळकर यांच्यासह अन्य नेते व कार्यकर्ते उपस्थित होते. भाजपा नेते व माजी नगरसेवकांनीही चोवीस तास पाणीपुरवठा योजना राबवणाऱ्या 'ओसीडब्ल्यू'च्या कार्यप्रणालीवर नाराजी व्यक्त केली.



# नायब तहसीलदारांनी केली शेळकेंच्या नर्सरीची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** डोमेगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाठीमागील गावठाण जागेवर सौ.सविता शेळके व बाबासाहेब शेळके या दाम्पत्यांने 5000 झाडं लावण्याचा संकल्प केला आहे. त्यानुषंगाने शेळके दाम्पत्यांने स्वखर्चाने नर्सरी तयार केली असून आज ( ता.8 ) गुरुवारी नायब तहसिलदार धनश्री भालचिम यांनी सदर नर्सरीची पाहणी करून शेळके दाम्पत्यांचे विशेष कौतुक केले. यावेळी शेळके दाम्पत्यांच्यावतीने नायब तहसिलदार धनश्री भालचिम यांचा ग्रामपंचायत कार्यालयात शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी कृषी सहायक विनोद कड, बाबासाहेब राधाकिसन शेळके, सौ. सविता बाबासाहेब शेळके,माजी सरपंच मुंजाराम चोथे, सोमनाथ चोथे, ग्रामपंचायत शिपाई विजय चौतमाल आदींसह इतर ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# गिरडाघाट ते देव्हारी रस्त्याचे काम अखेर पूर्ण

## फर्दापूर सार्वजनिक बांधकाम विभागाची उल्लेखनीय कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे हे गाव राज्यात भगवान चक्रधर स्वामी तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. दररोज हजारो भाविक भक्त सावळदबारा येथील चक्रधर स्वामी यांच्या दर्शनासाठी येतात आणि याच रस्त्याची पूर्ण वाट लागली दोन कि.मी. पिंपळवाडी ते गिरडा घाटाच्या पायथ्यापर्यत पूर्ण वाट लागली होती. परंतु सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी वेळोवेळी निवेदने देऊन या कि.मी. रस्ताची अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांनी दखल घेऊन राहिले रस्ताचे काम पूर्ण केले याबद्दल प्रवासी, ग्रामस्थ व माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी आभार मानले. देव्हारी, पिंपळवाडी मार्गे गिरडा घाटला व लालमाती कडे जोडला जानारा रोड या रोडाचे काम सार्वजनिक बांधकाम फर्दापूर विभागाचे वरिष्ट अधीकारी व ठेकेदार यांनी पूर्ण केले या रोडचे तीनतेरा वाजविले होते. सावळदबारा येथे महानुभीव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचे मोठे तिर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. येथे येणाऱ्या जाणाऱ्या भाविक भक्त यांना तारेवरची कसरत करावी लागत होती. रोडावरती मोठमोठे खड्डे पडुन पुर्ण खडी गिट्टी बाहेर निघुन पडलेली असल्यामुळे या परिसरामधुन भाविक भक्तांना प्रवास करताना प्रवाशांना स्वताचा जिव मुठीत धरुन तारावरची कसरत करत प्रवास करावा लागत होता.परंतु आता सावळदबारा ते बुलढाणा पर्यंत संपूर्ण रस्ता चांगला झाला आहे, असे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.



**बाकी रहिलेला रस्ता पूर्ण** : हा दोन कि .मी .रस्ता वन विभागामुळे थोडा थांबविण्यात आला होता .वनविभागाने परवानगी देताच आम्ही तात्काळ या पिंपळवाडी ते गिरडाघाटाच्या जिल्हा सीमा पर्यंत चा रस्ता चांगला करून दिला आहे . आता भाविक भक्तांना, प्रवाशांना त्रास होणार नाही खरोखरच दहा ते पंधरा वर्षांपासून हा खूपच खराब झाला होता .भाविक भक्त व प्रवासी यांनी हा त्रास सहन केल्या बद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतोआणि पुलाचे राहलेले वेरिंग कोटचे काम बाकी आहे ते आम्ही लवकरच पूर्ण करु . **अजय टाकसाळ उपविभागीय अभियंता, नितीन राठोड, शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग फरदापूर**

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# धुळे अंगणवाडी भरतीत घोळ व भ्रष्टाचार.!

## पात्र यादीतील विधवा व अन्य महिलांचा आरोप...

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत झालेल्या अंगणवाडीच्या भरतीत घोळ व भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप पात्र लाभार्थ्यांसह उबाठा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.एजंटच्या माध्यमातून 70 ते 80 हजार रुपयाची बोली लावण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पात्र यादीमधील मधील ज्या महिलांनी पैसे दिले असतील त्यांचेच या भरतीत सिलेक्शन झाला असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तर या भरतीची सखोल अशी चौकशी करावी अन्यथा पेट्रोल टाकून कार्यालयात आत्मदहन करणार असल्याचा इशाराही एका तरुणाने दिला आहे. धुळे महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत झालेल्या अंगणवाडीच्या भरतीत मोठ्या प्रमाणात घोळ व भ्रष्टाचार झाला असल्याचा दिसून आले आहे. अंगणवाडी सेविकेच्या निवड प्रक्रियेत पारदर्शकता न ठेवल्याचा आरोप अंगणवाडी सेविका पदासाठी अर्ज केलेल्या



महिला उमेदवाराने केला आहे. दरम्यान शासनाच्या मार्गदर्शक तत्वाचे पालन न करण्यात येऊन शैक्षणिक अर्हता,गुणवत्ता, वय बोलीभाषा इ. निकष डावलून बालविकास प्रकल्प अधिकारी व समितीतील सदस्यांनी व्यक्तिगत फायद्यासाठी पडद्याआडून एजंटच्या माध्यमातून 70 ते 80 हजार रुपयाची बोली करत आर्थिक व्यवहारा पोटी काही पात्र यादीतील मोजक्याच महिलांचे सिलेक्शन करत ही भरती पार पडली आहे.

वास्तविक या भरती संदर्भात अनेकांनी हरकत घेतली आहे त्या हरकतीवर समाधानकारक उत्तर न देता केवळ आर्थिक व्यवहारापोटी काहींना ऑर्डर देण्यात आली आहे तर गुणवत्ता डावलून आमच्यावर अन्याय केला असल्याचा आरोप ही याठिकाणी करण्यात आला आहे...... वरिष्ठांच्या माहितीनुसार पात्र यादीवर आम्ही स्वाक्षरी केली असल्याची महिला व बाल विकास विभागातील कर्मचारी महिलांनी दिली आहे. त्यामुळे ही भरती डोळे झाकपणाने होत असल्याचे निदर्शनास आल आहे..अनुसूचित जाती/ जमाती/ भटया जमाती प्रवर्गातील उमेदवारांना गुणदान देण्यात आलेले आहे, पारदर्शकतेला निवडीमध्ये सर्वोच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. मात्र या ठिकाणी नियमांचे उल्लंघन केलं गेलं असल्याचा आरोप करण्यात आला. तर भ्रष्टाचाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी पदासाठी अर्ज केलेल्या महिला उमेदवारांसह उबाठा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. यावेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख हेमालता हेमाडे , शिवसेना महानगर प्रमुख धीरज पाटील, यांसह आधी यावेळी उपस्थित होते.

# अध्यक्षपदी डॉ. सुनील रामटेके

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई येथील मराठी



अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. सुनील रामटेके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. डॉ. सुनील रामटेके हे एसएनडीटी महिला विद्यापीठ मुंबई येथे पदव्युत्तर मराठी विभागात प्रोफेसर व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते मूळचे विदर्भातील असून नाटककार व समीक्षक म्हणून सुविख्यात आहेत. मराठी व्याकरणावर त्यांनी मौलिक संशोधन केले आहे. महासूर्य हे त्यांचे महानाट्य बरेच गाजले आहे. याशिवाय अनेक ग्रंथांचे लेखन त्यांनी केले असून सम्यक या वार्षिक अंकाचे मागील २३ वर्षांपासून अखंडपणे संपादन करीत आहेत. साहित्य नाट्य भाषा आणि वैचारिक लेखन हे त्यांच्या अभिरुचीचे क्षेत्र आहे. विदर्भातील संस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. त्यांच्या मार्गदर्शनात एकूण दहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली असून विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर त्यांनी काम केले आहे. शैक्षणिक सामाजिक आणि वांग्मयीन- सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. एस एन डी टी विद्यापीठ हे भारतातील आणि दक्षिण आशियातील एकमेव सर्वात मोठे महिला विद्यापीठ असून या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर आहे.



# अक्षय भालेराव हत्या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या

## रिपाइं आठवले गटाचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्यावतीने नांदेड जिल्ह्यातील बोंढार हवेली या गावांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून, बौद्ध समाजातील भीमसैनिक अक्षय भालेराव याची हत्या जातीय दोषातून करणाऱ्या सर्व जातीवादी आरोपींना कठोर शासन करून सदरील खटला जलद गतीने न्यायालयात चालून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. तसेच अक्षय भालेराव यांच्या कुटुंबातील व्यक्तीला शासकीय सेवेमध्ये समाविष्ट करण्यात यावे व त्यांच्या कुटुंबांना शासनाकडून पन्नास लाखांची मदत तत्काळ देण्यात यावी. या मागणीचे निषेध निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले. या निषेध निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर खरात, तालुकाध्यक्ष फकीरराव भालेराव, तालुका सरचिटणीस भाऊराव गवळे, तालुका सचिव संजय जाधव, तालुका संघटक भास्कर खाजेकर, युवा नेते राहुल काळे, तालुका सहसल्लागार गजानन वाकळे, महिला तालुकाध्यक्ष राधा ताई शिंदे, महिला तालुका उपाध्यक्ष निर्मला शेवारे, महिला तालुका कार्याध्यक्ष उषाताई धनेधर, कविता शेवारे, तालुका सल्लागार अर्जुन भालेराव, शहर उपाध्यक्ष मिलिंद जाधव, शहर सचिव विकास बनकर, वेरूळ जि. प. सर्कल प्रमुख गुलाब सातदिवे, गदाना जि. प. सर्कल प्रमुख भाऊसाहेब बनकर, बोरगाव सर्कल प्रमुख वाल्मीक ढिवर, ज्येष्ठ नेते दगडू धनेधर, रमेश गरुड, अरुण गरुड आदी संख्येने उपस्थित होते.

# इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र देवगिरी प्रांत कार्यकारिणी बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अखिल भारतीय इतिहास संकलन योजना दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र देवगिरी प्रांत कार्यकारिणी बैठक संघटन सचिव प्रमुख पाथेय बालमुकुंद पांडे भाईजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. प्रमुख उपस्थिती डॉ. राधाकृष्ण जोशी प्रांत संघटन सचिव डॉ. व्यंकटेश लांब कार्याध्यक्ष, डॉ. हरीभाउ जमाले, विद्यापीठ अभ्यास मंडळ अध्यक्ष, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर, डॉ. मुकुंद देवर्षी, अध्यक्ष देवगीरी प्रांत, प्रा. धनजंय जवळेकर, सचिव कार्यकारीणी नव नियुक्त दायित्व डॉ. बालमुकुंदजी पांडे यांनी मार्गदर्शन केले. भारताचा गौरव शाली व आत्मसन्मानाचा इतिहास परंपरा संस्कृती हा अभ्यास क्रमात यावा आज भारत विजयाच्या मार्गावर भारताचा स्व का इतिहास संशोधन करुन पुढे आणणे भारतीय तत्वज्ञान, ग्रंथ, विविध एतिहासिक पूरावे जमा करणे, वास्तविक भारताचा इतिहास पुढे आणणे, गाव तालुका जिल्हा स्तर इतिहास मंदिर मठ कथा किल्ले यात इतिहास आपल्याला मिळते या पुरावा च्या आधारे इतिहास लिहणे यांसाठी संघटन आवश्यक आहे. भारतीय परंपरा टिकवुन ठेवणे समृध्द इतिहास देणेसाठी संघटन इतिहास संकलन संस्था कार्य करते. नामुंल लिख्यते किश्चित हे ब्रीद वाक्य ध्येय समोर ठेवुन कार्य करणे. डॉ. लांब व हरीभाउ जमाले, प्रा.डॉ. रवी सातभाई, डॉ. सरडे डॉ शांता जाधवर यांनी मत व्यक्त केले. नवीन शैक्षणिक धोरणात स्थानिक इतिहास, गौरवशाली विजयाचा इतिहास भारत वर्षाचा मांडणे देश घडवणारा विजयीभव या स्थितीत आपण आहोत समाज जागृती होत आहे. नवीन शैक्षणिक धोरण हे योग्य आहे गावातील मंदिराचा इतिहास जपणे यातून आत्मविश्वास जागृत करणे शक्य विखुरलेला इतिहास संकलन इतिहासाचे जतन करने इ कार्य करण्याचे ठरवण्यात आले आहे. यानिमित्त कार्यक्रम राबवणे समाजास इतिहास माहीत करुन देणे प्रांत अध्यक्ष व संपूर्ण कार्यकारीणीचे अभिनदंन करणे ठराव जोशी मांडला प्रा धनजंय जवळेकर यानी अनुमोदन दिले.



# विंचूर येथे माजी सैनिकाच्या खूनप्रकरणी दोघा आरोपींना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** विंचूर ता.निफाड येथे माजी



सैनिकाची हत्या झाली असून अवघ्या पाचच दिवसांत लासलगाव पोलिस आरोपींचा शोध घेण्यात यशस्वी झाले आहेत. याबाबत सविस्तर वृत्त असे की, दि. १ जून रात्री ९ वाजेच्या सुमारास वैशाली किशोर शिंदे रा.पांडुरंगनगर या माजी सैनिक बाळासाहेब पोतले यांना जेवणाचा डब्बा देण्यासाठी गेल्या. त्यांनी दरवाजा ठोठावला मात्र आतून प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी खिडकीतून डोकावून बघितले असता त्यांना बाळासाहेब पोतले हे पलंगावर मयत अवस्थेत आढळून आले. याबाबत त्यांनी तातडीने पोलीस ठाण्यात ही माहिती दिली. त्यांच्या खबरीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात फौजदारी प्रक्रिया संहिता १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. मयत हे माजी सैनिक असल्याने या प्रकरणाची खुद्द पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी दखल घेऊन अपर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, सोहेल शेख, उपविभागीय पोलिस अधीक्षक मनमाड उपविभाग यांनी केलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे स.पो. नि.राहुल वाघ, पो.ना.योगेश शिंदे, पो.कॉ. प्रदीप आजगे, पो.कॉ.कैलास मानकर यांचे पथक तयार करण्यात आले. घटनास्थळी पाहणी करताना प्रथमदर्शनी पोतले यांचा घातपात झाल्याचा संशय पोलिसांना होता. तपासादरम्यान गावातीलच पोतले यांचे मित्र रामदास सालकाडे व सुनील मोरे हे दोघे मयत पोतले यांचेकडे नियमित दारू पिण्यासाठी येत असायचे. मात्र पोतले मयत झाल्यापासून हे दोघे गावातून गायब असल्याची माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी तातडीने चक्रे फिरवत त्यांचा शोध घेतला व सखोल विचारपूस केली असता त्यांनी मयत मित्र बाळासाहेब पोतले यांचेशी दारू पिण्याच्या कारणावरून आपआपसात बाचाबाची होऊन पोतले यांना पलंगावर जोरात लोटून दिले व नाक व तोंड दाबून मारल्याबाबत कबुली दिली. त्यांच्या शरीराची कुठलीही हालचाल होत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी पोतले यांचा मोबाईल, रोख रक्कम, एटीएम कार्ड, चेक पुस्तक व मारुती सुझुकी वॅगन आर कार क्र. एम.एच.१५ एफ.एफ ५३६९ कारसह त्या ठिकाणाहून पळून गेले असा कबुली जबाब दिला. रामदास मारुती सालकाडे, रा.सालकाडे वस्ती, सुनिल माणिक मोरे, रा.किसनवाडी यांना मा.न्यायालय निफाड येथे हजर केले असता मा. न्यायालयाने दि.९ जून २०२३ रोजी पावेतो पोलिस कस्टडी रिमांड देण्यात आला आहे. पुढील तपास स.पो.नि.राहुल वाघ, पो.ना योगेश शिंदे, पो.कॉ प्रदिप आजगे, पो.कॉ कैलास मानकर हे करत आहे.



# प्री-वेडिंग शूट बंद करा, आवाहनाला मोठा प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या प्रि वेडिंग शूटिंग बंद करा या आवाहनाला जिंतूर येथे मोठा प्रतिसाद मिळाला तसेच समाजाची स्वतंत्र जनगणना नोंदणीचा प्रारंभ राज्य अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या राज्यस्तरीय संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभेत नुकत्याच घेतलेल्या प्री-वेडिंग शूटिंग या वाढत्या पद्धतीला बंदी घेण्याचा ठराव पारित केला होता यासाठी केलेल्या आवाहनाला राज्यभरासह जिंतूर येथेही मोठा प्रतिसाद मिळाला आहे महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या जिंतूर तालुका पदाधिकारी पदग्रहण सोहळ्यानिमित्त एका विशेष कार्यक्रमात हा विश्वास समाज बांधवांनी दिला. आर्य वैश्य समाजाची जनगणना प्रारंभ करण्यात आली येथील नगरेश्वर मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात आज जिल्हा बैठक तालुका कार्यकारणी पदग्रहण सोहळा गरीब व होतकरू विधवा परित्यकत्या महिलांना पिठाची गिरणी वाटप करण्याचा कार्यक्रम झाला परभणी जिल्ह्यात कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती उपसभापती संचालक पोलीस पतपेढी चेअरमन संचालक आदींचा सत्कार, समाजाच्या जनगणनेचा प्रारंभ करण्याचा कार्यक्रम असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे अध्यक्ष श्री नंदकुमार गादेवार उपस्थित होते यावेळी विशेष उपस्थिती श्री महेश महाराज जिंतूरकर प्रमुख पाहुणे म्हणून भानुदास राव वट्टमवार पुणे सुधीर पाटील परभणी सुमित रुद्रवार बीड बालाजी डूबेवार परभणी किरण वट्टमवार सखाराम चिद्रवार विशाल नारलेवार रमेश पेकम यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती प्रारंभी श्री कन्यका परमेश्वरी मातेचे व संत श्री रंगनाथ



महाराज परभणीकर गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली याचवेळी समाजाचे कुलगुरू दिवंगत भास्कराचार्य महाराज बोधनकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली मार्गदर्शन करताना गादेवार यांनी विवाह समारंभात प्री-वेडिंग शूटिंग करून वाढत्या प्रकाराबद्दल चिंता व्यक्त करून या प्री-वेडिंगला समाजातील बांधवांचा नकारात्मक दृष्टिकोन लक्षात घेऊन राज्याच्या सर्वसाधारण सभेत नुकताच बंदी बाबत ठराव पारित करण्यात आला होता त्या अनुषंगाने उपस्थित समाज बांधवांना त्यांनी संबोधित करून प्रश्न उपस्थित केला तेव्हा समाज बांधवांनी प्री-वेडिंग करू नका असे सांगत या आव्हानाला प्रतिसाद दिला दरम्यान महासभेच्या वतीने गरजवंत 17 महिला लाभार्थ्यांना गिरणी वाटप करण्यात आले जिंतूर तालुका महासभेच्या नूतन पदाधिकारी पदग्रहन शपथ देण्यात आली मान्यवरांच्या सत्कार सोहळ्यानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली प्रस्ताविक प्रदीप कोकडवार संचलन स्वप्निल येरमवार तर आभार प्रदर्शन आदित्य कोकडवार यांनी केले. महासभेचे पदाधिकारी आणि जिल्ह्यातील लाभार्थी यावेळी उपस्थित होते.






# जिल्हा कारागृहासाठी संरक्षण भिंत लोकार्पण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा कारागृह अधिकारी वसाहत ते जेलच्या गेटपर्यंत संरक्षण भिंत बांधणे या १०लक्ष खर्चाच्या कामाचा सलीम शाह यांचेहस्ते शुभारंभ करण्यात आला.

धुळे शहर मतदार संघातील नागरी वसाहतीमध्ये विकासकामांचा सपाटा कायम असतांनाच काही शासकीय कार्यालयांनी निधी मागणी केल्यावर त्याची तत्काळ पुर्तता करण्याची भूमिका आ.फारुख शाह यांची राहिली आहे. यापूर्वी शहरातील विविध शासकीय कार्यालयांना संगणक संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत.जिल्हा उपनिबंधक कार्यालयात नागरिकांना खुप वेळ वाट पाहत थांबावे लागते त्यादृष्टीने नारिकांना बसण्यासाठी सिमेंट बेंच बसवून देण्यात आले. जिल्हा कारागृहाची बाहेरील संरक्षक भिंत जीर्ण झाली होती, नवीन संरक्षक



भिंतीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी कारागृह प्रशासनाने मागणी केली होती. त्यानुसार तत्काळ स्थानिक विकास निधीतून रुपये १० लक्षचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. धुळे जिल्हा कारागृह अधिकारी वसाहत ते जेलच्या गेटपर्यंत संरक्षण भिंत बांधणे या कामाचा शुभारंभ सलीम शाह यांचे हस्ते करण्यात आला.यावेळी जिल्हा कारागृह अधीक्षक विशाल बांदल, उपअधिक्षक झिंजूर्डे, असिस्टंट जेलर गुजराथी, कनिष्ठ अभियंता हेमंत पावटे, डॉ. दीपश्री नाईक, प्यारेलाल पिंजारी, डॉ.बापुराव पवार, निजाम सैयद, डॉ. शराफत अली, इकबाल शाह, निसार बापू निमखेडे, साकीब शाहव जेलचे कर्मचारी व बंदीवान उपस्थित होते.

# कृषी विभागाची खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात व तालुक्यात सोयगाव यंदा खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने बाजारात बियाणे व खताची निकृष्ट दर्जा राहू नये शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे व रासायनिक खत मिळावी, यासाठी सुभाष आढाव उपविभागीय कृषी अधिकारी सिल्लोड व तालुका कृषी अधिकारी आर.जी. गुंडिले यांनी पुढाकार घेऊन कृषी विभागाच्या भरारी पथकाने अचानक दि.७/६/२०२३ बुधवार रोजी सोयगावात कृषी सेवा केंद्र दुकान जाऊन तपासणीची मोहीम हाती घेतली आहे. यामध्ये कृषी सेवा केंद्र दुकानाची वेगवेगळ्या पद्धतीने कसून एक्स पायर झालेल्या खत,व बियाणे याची तपासणी करु लागले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यावर्षी उच्च दर्जाचे बियाणे व रासायनिक खते मिळणार असल्याचा विश्वास यावेळी सुभाष आघाव उपविभागीय कृषी अधिकारी सिल्लोड व तालुका कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी आर.जी.गुंडिले यांनी व्यक्त केला.सोयगाव तालुक्यात सुमारे ८३ गावे असून ४२ हजार हेक्टर क्षेत्र खरीप लागवड योग्य आहे. परंतु बाजारात उपलब्ध असलेले बियाणे चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. निकृष्ट दर्जाचे बियाणे शेतकऱ्यांनी लागवड केल्यास संपूर्ण वर्ष शेतकल्याचे वाया जाऊ शकते.यासाठी सोयगाव कृषी विभाग सतर्क झाला असून सोयगाव तालुक्यातही कृषी सेवा केंद्रांची तपासणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.कृषी अधिकारी थेट कृषी सेवा केंद्राच्या दुकानात जाऊन विविध प्रकारची तपासणी केली जात आहे. या पथकांने कृषी सेवा केंद्रावर जाऊन बियाणे व रासायनिक खताची मात्रा तपासून लागले आहे. खरीप हंगाम तोंडावर आला असल्याने तसेच खतांचे लिंक अप किंवा चढ्या दराने विक्री केल्यास कठोर कारवाई केली जाईल.कारण शेतकऱ्यांची बियाणे खत खरेदीची लगबग सुरू झाली आहे. अशा भाई गर्दीत शेतकऱ्याला कमी प्रतीचे, निकृष्ट दर्जाचे खत, बियाणे दिल्यास त्या कृषी सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल करण्यात येईल अशा इशारा कृषी अधिकारी आर.जी.गुंडीले यांनी कृषी सेवा केंद्र चालकांना बुधवार रोजी दिला आहे. सोयगाव तालुक्यात कृषी सेवा केंद्र चालकांचा समाधान कारक खुलासा नसल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल. केंद्र चालकांना स्टॉक रजिस्टर अपडेट करणे, ठळक अक्षरात रेट फलकावर बियाण्यांच्या लिस्ट लावणे,खरेदीचे पक्के बिल शेतकऱ्यांना देणे व एम आर आर पी पेक्षा जादा दराने करु नये.नाहीतर आजूक पुढील कारवाई आजूक कडक केली जाणार असल्याचे सुभाष आघाव उपविभागीय कृषी अधिकारी सिल्लोड व तालुका कृषी अधिकारी आर.जी.गुंडिले यांनी बोलताना सांगितले सदर तपासणी पथकात एम.पी.सौदणे कृषी अधिकारी, एस.आर.चौधरी कृषी पर्यवेक्षक, मानसिंग राजपूत कृषी सहाय्यक, मयूर पाटील कृषी सहाय्यक, मयूर बारी तंत्र सहाय्यक या पथकांचा समावेश आहे.

# अक्षय भालेराव हत्येतील आरोपींना फाशी द्या

## सम्राट अशोक, फुले, आंबेडकर जयंती उत्सव समितीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** बोंढार, ता.जि.नांदेड येथील आंबेडकरी तरूण अक्षय भालेराव यांची जातीयवादी लोकांकडून निर्घृण हत्या करण्यात आली. हत्या करणाऱ्या आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी या आशयाचे निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना तहसीलदार चिखली यांच्या मार्फत सम्राट अशोक फुले -आंबेडकर जयंती उत्सव समिती 2023 तथा समस्त आंबेडकरी समाजबांधवानी दिले. निवेदनात नमूद करण्यात आले की, बोंढार जि.नांदेड गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती का साजरी करण्यात आली यांचा राग मनात धरून जातीयवादी मानसिकतेतून अक्षय भालेराव या आंबेडकरी तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात येऊन त्यांची



निर्घृण हत्या करण्यात आली त्याचप्रमाणे आंबेडकरी वस्तीवर दगडफेक करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा आंबेडकरी समाज जाहिर निषेध करीत आहे. त्याचप्रमाणे आरोपींना कठोरात कठोर फाशी ची शिक्षा देण्यात यावी व हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालविण्यात यावे अशी मागणी चिखली शहरातील आंबेडकरी समाज व सम्राट अशोक फुले आंबेडकर जयंती उत्सव समिती च्या वतीने निवेदन देण्यात आले. या वेळी सम्राट अशोक फुले आंबेडकर जयंती उत्सव समिती चे अध्यक्ष एस एस गवई, प्रशांत उदयराव भरकार, प्रा. एस. जी. राऊत, व्ही. डी. गवई, रमेश साळवे, समाधान भटकर, ॲड. आर. डी. जाधव,अरुण हिवाळे, दंगमोहन कोकडे, प्रा. आर. डी. गवई, राजेंद्र सुरडकर, मिलींद भंडारे, परसराम शिंगणे, विलास जाधव, मनिष गवई, निलेश समाधान जाधव, दीपक थोरात, श्रीकांत शिनगारे सुमेध नारायण जाधव, सुशिलकुमार राऊत, दिनकर निकाळजे, विशाल खरात, प्रा. मिलींदकुमार मघाडे, संजय जाधव, प्रशांत झिने,विलास घोरपडे, इंजि एन के सरदार, दयानंद निकाळजे, सिद्धार्थ विणकर, ॲड डी व्ही पवार, प्रशांत डोंगरदिवे यांनि निवेदनावर सह्या केल्या.